नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १८८ * * अकोला * शनिवार, दिनांक १० जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## नाशिकमध्ये २३.४० लाखांचे ड्रग्ज जप्त

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ९ :
महाराष्ट्रातील नाशिकमध्ये पोलिसांनी एम्फेटामाइन आणि गांजासह ३ जणांना अटक केली आहे. जप्त केलेल्या अंमली पदार्थांची एकूण किंमत सुमारे २३.४० लाख असल्याचे सांगण्यात आले आहे.

एका पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, मुन्ना कल्लू कोल (४०), शांती मुन्ना कोल (३३) आणि अमर मुन्ना कोल (१९) यांना कैथे कॉलनीतील एका खोलीत छापा टाकून पकडण्यात आले. अधिकाऱ्याने सांगितले की, तिन्ही आरोपी शेजारील राज्य मध्य प्रदेशातील सतना जिल्ह्यातील रहिवासी आहेत आणि नाशिकमध्ये मजुरीचे काम करत होते. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

## किडनीतील काटे आणि कंगोरे




चंद्रपूर जिल्ह्यातील ३६ वर्षीय पीडित शेतकरी रोशन कुडे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन केलेले वक्तव्य अतिशय गंभीर आहे. हे प्रकरण शेतकऱ्याची किडनी काढण्यापुरते मर्यादित नाही, कर्जापाई त्या गरीब शेतकऱ्याने आपली किडनी विकली. हे सत्य असले तरी अशा लोकांना शोधून त्यांच्या किडनीचा व्यापार करणारे आंतरराष्ट्रीय षडयंत्र एवढे मोठे असेल असे कोणालाच वाटले नव्हते. खरे पाहायला गेले तर हे एका मुंगीचे महाभारत आहे असेच दिसते. हे प्रकरण वाटते तेवढे साधे सोपे नाही कारण एकापेक्षा एक अशा अनेक गुंतागुंतीचे खुलासे दररोज करण्यात येत आहेत. आजच्या खुलाशामध्ये त्या शेतकऱ्याने त्याच्यावर एका मोठ्या राजकीय नेत्यांकडून प्रचंड दबाव टाकण्यात येत आहे असा आरोप केला गेला आहे. जर त्याच्यावर एखाद्या राजकीय नेत्याने प्रचंड दबाव आणला ही गोष्ट खरी असेल तर हे प्रकरण फारच गंभीर दिसत आहे. या शेतकऱ्याजवळ आंतरराष्ट्रीय स्तरावरचे पुरावे कुठून आले हा सुद्धा प्रश्न आहे. ज्याअर्थी हा माणूस अत्यंत गंभीर खुलासे करणार आहे याचा अर्थ हे प्रकरण वाटते तेवढे साधे सोपे नाही. या पिडीत शेतकऱ्याची वरवरची माहिती आपण ऐकली आहे पण आता तो जे खुलासे करणार आहे ते खुलासे त्याला करता येतील की नाही. हाही मोठा सवाल या प्रकरणातील या प्रकरणाच्या निमित्ताने उभा आहे. चंद्रपूर सारख्या जिल्ह्यातील सहा सावकार या प्रकरणात अडकलेले आहेत. यावरून या सावकारांचे लागेबांधे किती दूरवर पोहोचलेले आहेत आणि केवळ हा माणूस एक पिडीत शेतकरी आहे अशा पद्धतीने हे प्रकरण पाहू नये. पत्र परिषदेत त्यांनी लवकरच पूर्ण खुलासे करू असे आश्वासन दिले आहे. परंतु त्या पिडीत शेतकऱ्याला ते आश्वासन पूर्ण करता येईल काय, असाही प्रश्न या पत्रकार परिषदेच्या निमित्ताने उभा राहिलेला आहे. या प्रकरणात मुख्य आरोपी असलेल्या डॉक्टरला न्यायालयाने जामीन नाकारलेला आहे तो ही फरार आहे. त्याला शोधणे आणि जेरबंद करणे पोलिसांचे काम आहे. पण हा शेतकरी जे सांगतो त्यावरून या रॅकेटमध्ये आंतरराष्ट्रीय धागेदोरे आणि त्यांच्यासोबत असलेल्या त्या देशातील डॉक्टरांपासून इतर अनेक मोठमोठे लोक हे प्रकरण दडपण्यासाठी काहीही करू शकतात. ज्याअर्थी विरोधी पक्षातील नेत्यासोबत हा शेतकरी पत्रकार परिषद घेतो, त्याअर्थी या शेतकऱ्याला आपल्यावर झालेल्या अन्यायाची दाद मागणे आणि त्यासाठी आंतरराष्ट्रीय षडयंत्राचा गौप्यस्फोट होणे गरजेचे वाटते. विशेष म्हणजे या सगळ्या गोष्टी पत्रकारांना बोलावून सांगाव्या लागत आहेत. आता भविष्यकाळात कोणकोण उघडे पडतील हे पहावेच लागेल. आपली यंत्रणा किती कीडलेली आहे याचेही खुलासे होतील कारण भारतात जी यंत्रणा आहे ती यंत्रणा किती प्रकारे वाकवता येते. पैशासाठी किती आणि कुठले नियम कसे गुंडाळून ठेवता येतात याबाबत न बोललेलेच बरे. निश्चितच या सगळ्या गोष्टी देशाची शोभा वाढवणा?्या नाहीत. हा पिडीत शेतकरी आता व्हीआयपी बनलेला दिसतो. एका किडनीचे दान देऊन त्याने किडण्यांच्या समाजद्रोही व्यापारावर जो हल्ला केला आहे. त्यावरून या व्यक्तीजवळ बऱ्याचशा गोष्टी असतील. या प्रकरणाचे सर्व धागेदोरे त्याला कुठून कसे मिळाले याचाही शोध घ्यावा लागेल. दुसरा प्रश्न असा आहे की हा माणूस जे खुलासे करणार आहे त्याच्याकडे ते पुरावे कुठून आणि कसे आले तेही त्याला सांगावे लागेल. म्हणजे या प्रकरणाची व्याप्ती अर्थातच फारच व्यापक आहे. आता त्याच्या गौप्यस्फोटापूर्वी आपली सरकारी यंत्रणा जागृत होते काय हेही बघावे लागेल. या प्रकरणातील काटे आणि कंगोरे शोधणे हेच मोठे आव्हान आहे. कारण चंद्रपूर सारख्या जिल्ह्यात इतके मोठे आंतरराष्ट्रीय कारस्थान झाले असेल आणि जर त्या आंतरराष्ट्रीय कटाचा जर परिपूर्ण खुलासा झाला. तर त्या पीडित शेतकऱ्याने राष्ट्रीय कर्तव्यच बजावले असेच म्हणावे लागेल.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## महानगरपालिका निवडणुकीत राज ठाकरे ठरतील
# मोठ्या पराभवाचे धनी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भविष्यवाणी



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्याबाबत केलेल्या एका खळबळजनक वक्तव्यामुळे नव्या राजकीय वादाला तोंड फुटले आहे.

एका मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरे केवळ पराभूत होणार नाहीत, तर इतिहासात सर्वात मोठ्या पराभवाचे धनी म्हणून ओळखले जातील, अशी थेट भविष्यवाणी केली. निकाल आल्यानंतर हे चित्र स्पष्ट होईल, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, आज राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येत असले तरी या युतीला आता कोणतेही राजकीय महत्त्व उरलेले नाही. त्यांच्या मते, जर २००९ सालीच शिवसेना आणि मनसे एकत्र आले असते, तर महाराष्ट्राची राजकीय परिस्थिती आज वेगळी असती. त्या काळात या युतीला मोठ्या प्रमाणात मतदारांचा पाठिंबा मिळाला असता. मात्र आता वेळ निघून गेली असून, दोन्ही नेत्यांकडे पूर्वीसारखी मतांची ताकद राहिलेली नाही, असा दावा फडणवीस यांनी केला.

फडणवीस म्हणाले की, या निवडणुकीनंतर राज ठाकरे यांचा आतापर्यंतचा सर्वात मोठा पराभव होणार आहे. या युतीचा फायदा उद्धव ठाकरे यांना होऊ शकतो, मात्र राज ठाकरे यांना त्यातून काहीही मिळणार नाही, राज ठाकरे यांच्या मतांचा आधार आता संपलेला असून, त्यांची भूमिका या युतीत दुय्यम ठरेल, राज ठाकरे केवळ निवडणूक हरतील असे नाही, तर इतिहासात सर्वात मोठ्या पराभवाची नोंद त्यांच्या नावावर होईल, ही माझी ठाम भविष्यवाणी आहे, असे सांगत त्यांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली.

फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही जोरदार टीका केली. जन्मामुळे मालमत्ता मिळू शकते, पण विचारांचा वारसा मिळत नाही, अशी खोचक टिप्पणी करत त्यांनी उद्धव ठाकरे यांना विचारधारेशी संबंधित वारसा मिळालेला नाही, असा आरोप केला. फडणवीस यांच्या या वक्तव्यामुळे ठाकरे गटात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

## यापुढे कंपन्या करतील स्लीपर बसची निर्मिती

### वाढत्या अपघाताच्या पार्श्वभूमिवर केंद्र सरकारचा मोठा निर्णय



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :
आता स्लीपर बसेसची निर्मिती केवळ ऑटोमोबाइल कंपन्या किंवा सरकारमान्य संस्थाच करू शकतील, अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. सध्याच्या स्लीपर बसेसनाही नवीन सुरक्षा मानकांसह अद्ययावत करावे लागेल. हा निर्णय स्लीपर कोच बसेसमध्ये सातत्याने वाढणाऱ्या आगीच्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी घेण्यात आला आहे.

गडकरी यांनी सांगितले की, आधीपासून सुरू असलेल्या स्लीपर कोच बसेसमध्ये फायर डिटेक्शन सिस्टीम, आपत्कालीन बाहेर पडण्याचा मार्ग (हातोड्यासह), आपत्कालीन प्रकाश व्यवस्था आणि ड्रायव्हर ड्रोजीनेस (झोप येण्याची चेतावणी) इंडिकेटर बसवणे बंधनकारक असेल. गेल्या ६ महिन्यांत स्लीपर कोच बसेसशी संबंधित आगीचे ६ मोठे अपघात समोर आले आहेत, ज्यात १४५ लोकांचा जीव गेला.

## '५० खोके एकदम ओके'

### भाजप पदाधिकाऱ्यांची शिंदेसेनेविरोधात घोषणाबाजी

महायुतीतील संघर्ष चव्हाट्यावर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :
छत्रपती संभाजीनगर आणि पुण्यात भाजप व शिंदे गटातील शिवसेना यांच्यातील युती तुटल्यानंतर दोन्ही पक्षांमध्ये तणाव निर्माण झाला होता. हा तणाव आता थेट मुंबईतही उफाळून आला आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत एकत्र लढणारे हे दोन्ही मित्रपक्ष प्रत्यक्ष रस्त्यावर आमनेसामने आल्याचे चित्र शुक्रवारी पाहायला मिळाले. मुंबईतील वॉर्ड क्रमांक १७३ मध्ये प्रचारादरम्यान भाजप आणि शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार वाद झाला, ज्यामुळे वातावरण ढवळून निघाले आहे.

भाजपच्या शिल्पा केळुस्कर आणि शिंदे सेनेच्या पूजा कांबळे यांच्यात मैत्रीपूर्ण लढत होत आहे. शुक्रवारी सकाळी दोन्ही उमेदवारांचे प्रचार फेरी सुरू असताना दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते एकाच परिसरात एकत्र आले. सुरुवातीला वातावरण शांत होते, मात्र अचानक भाजपच्या काही कार्यकर्त्यांनी माईकवरून ५० खोके एकदम ओके अशा घोषणा देण्यास सुरुवात केली. त्यामुळे हा संघर्ष आता शिगेला पोहचला आहे.

## भाजपमधून २६ बंडखोरांची हकालपट्टी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
मुंबई महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप-शिवसेना शिंदे गट महायुतीच्या उमेदवारांच्या विरोधात निवडणूक लढवणाऱ्या २६ बंडखोरांची भाजपने पक्षातून हकालपट्टी केली आहे. पक्षशिस्तीचा भंग करणाऱ्या या बंडखोरांना पक्षातून सहा वर्षासाठी निलंबित करण्यात आले आहे. मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम यांनी ही कारवाई केली.

मुंबई महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारीला मतदान होत आहे. या निवडणुकीसाठी भाजपने शिवसेना शिंदे गट आणि रिपब्लिकन पक्ष आठवले गट यांना सोबत घेतले आहे. या महायुतीमुळे भाजपला मित्र पक्षांना जागा सोडाव्या लागल्या. त्यामुळे उमेदवारी न मिळालेल्या भाजपच्या इच्छुकांनी बंडाचे निशाण फडकवत पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे. मुंबईतील भाजपचे नेते आशिष शेलार, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड यांनी या बंडखोरांच्या भेटीगाठी घेऊन त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, उमेदवारी मागे घेण्याची पक्षाची विनंती त्यांनी धुडकावून लावली. त्यामुळे अखेर भाजपने त्यांच्यावर कारवाईचा बडगा उचलला.

निलंबनाची कारवाई करण्यात आलेल्या भाजप बंडखोरांमध्ये प्रभाग क्रमांक ६० च्या दिव्या ढोले, प्रभाग क्रमांक १७७ च्या नेहल अमर शहा, प्रभाग क्रमांक २०५ च्या जानव्ही राणे, प्रभाग क्रमांक २ च्या आसावरी पाटील, प्रभाग क्रमांक १६६ चे मोहन आंबेकर, प्रभाग क्रमांक ७३ च्या स्नेहाली वाडेकर, प्रभाग क्रमांक १३१ च्या धनश्री बगेल, प्रभाग क्रमांक ७४ च्या प्रिया मर्गज , प्रभाग क्रमांक १५९ च्या शोभा साळगावंकर, प्रभाग क्रमांक ३७ च्या सुचित्रा नाईक, प्रभाग क्रमांक ६१ च्या उर्मिला गुप्ता आदींचा समावेश आहे.

## २८ जानेवारीपासून संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ९ :
संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ जानेवारीपासून सुरू होऊ शकते. केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी, रविवारी सादर केला जाऊ शकतो.

संसदेच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सांगितले की, हा संभाव्य कार्यक्रम संसदीय कामकाज मंत्रिमंडळ समितीने तयार केला आहे. त्यानुसार, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू 28 जानेवारी रोजी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित करतील.

राष्ट्रपतींचे पारंपरिक अभिभाषण वर्षाच्या पहिल्या संसद अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी होते. दोन्ही सभागृहे २९ जानेवारी रोजी भेटणार नाहीत, कारण त्याच दिवशी बीटिंग रिट्रीट समारंभ आयोजित केला जाईल.

संसद ३० जानेवारी रोजी बैठक घेईल. त्या दिवशी आर्थिक सर्वेक्षण सादर केले जाऊ शकते. ३१ जानेवारी रोजी लोकसभा आणि राज्यसभा बसणार नाहीत. केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी, रविवारी सादर केला जाईल.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर आणि केंद्रीय अर्थसंकल्पावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर, संसद १३ फेब्रुवारीपासून सुमारे एक महिन्याच्या सुट्टीसाठी स्थगित होईल. संसद ९ मार्च रोजी पुन्हा बैठक घेईल आणि अधिवेशन २ एप्रिल, गुरुवारी संपेल. संसद शुक्रवारी स्थगित केली जाते, परंतु ३ एप्रिल रोजी गुड फ्रायडे आणि त्यानंतरच्या वीकेंडचा विचार करता, अधिवेशन २ एप्रिल रोजी संपू शकते.

## शिंदेसेना, राष्ट्रवादीचा भाजपला धक्का

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
अंबरनाथ नगरपरिषदेत काँग्रेसचे १० नगरसेवक फोडणाऱ्या भाजपला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेने जोरदार झटका दिला आहे.

शिंदे गटाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसशी युती करून अंबरनाथमध्ये आपली सत्ता स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी, काँग्रेसच्या फुटीर नगरसेवकांच्या मदतीने अंबरनाथची सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करणा?्या भाजपला मोठा हादरा बसला आहे. शिंदे गटाच्या या राजकारणामागे एकनाथ शिंदेंचे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे असल्याचा दावा केला जात आहे.

भाजपच्या खेळीमुळे शिंदे गट दुखावला गेला. परिणामी, त्याने भाजपची खेळी त्यांच्यावरच उलटून टाकण्याची धूर्त राजकीय खेळी खेळली. एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र श्रीकांत शिंदे यांनी भाजपच्या संपर्कात गेलेल्या अजित पवारांच्या पक्षाशी संधान साधले. त्यांना विश्वासात घेत त्यांच्यापुढे अंबरनाथमध्ये युती करून संयुक्त सत्ता स्थापन करण्याचा प्रस्ताव ठेवला आणि भाजपाला धक्का दिला.

## जिजाऊ जन्मोत्सवाबाबत प्रशासन उदासीन?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
राजमाता जिजाऊंच्या जन्मभूमीवर दरवर्षी लाखो भाविकांना साद घालणारा जिजाऊ जन्मोत्सव अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपला असतानाही प्रशासन आणि राजकीय नेतृत्वाकडून दिसणारी उदासीनता आता उघडपणे समोर आली आहे.

बुलढाणा सिंदखेड येथे १२ जानेवारीला साजरा होणाऱ्या या ऐतिहासिक सोहळ्याच्या नियोजनाकडे दोन्ही पालकमंत्र्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत मराठा क्रांती मोर्चा आक्रमक झाला आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील यांनी अद्यापपर्यंत जिजाऊ जन्मोत्सवाच्या संदर्भात एकही आढावा बैठक घेतलेली नाही, असा गंभीर आरोप मराठा क्रांती मोर्चाने केला आहे.

मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक यांनी थेट सरकार आणि प्रशासनावर हल्लाबोल करत सांगितले की, राजमाता जिजाऊ या केवळ एका समाजाच्या नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या प्रेरणास्थान आहेत. मात्र त्यांच्या जन्मोत्सवाच्या नियोजनाबाबत प्रशासनाची बेफिकिरी अत्यंत लज्जास्पद आहे.

## पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ ४ कोटीचा निधी गोळा

■ वृत्तसंस्था, बीड, दि. ९ :
महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात चार लोकांविरुद्ध फसवणूक करून ४ कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम जमा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी दावा केला होता की, ही रक्कम इस्रायलसोबतच्या युद्धात पॅलेस्टाईनला पाठिंबा देण्यासाठी वापरली जाईल.

स्थानिक पोलीस आणि त्यांच्या दहशतवादविरोधी पथकाला संशयास्पद दहशतवादी निधीबद्दल माहिती मिळाली होती. माजलगावच्या पातरुड गावात शोध घेण्यात आला.
ही रक्कम एका अशा ट्रस्टच्या बँक खात्यात जमा करण्यात आली होती, जो धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत नव्हता. यामुळे निधी गोळा करणे अवैध ठरते. त्यांनी सांगितले की, माजलगाव ग्रामीण पोलिसांनी चौघांविरुद्ध फसवणूक आणि बनावटगिरीचा गुन्हा दाखल केला आहे, त्यापैकी दोघांना अटक करण्यात आली आहे.

## देवेंद्र फडणवीस म्हणजे डेव्हलपमेंट....



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :
महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंच्या युतीवर भाष्य करत टीका केली आहे.

बावनकुळे म्हणाले, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना भावनात्मक मते मागायची आहेत. महाराष्ट्रातील जनता विकासाला मत देते. राज ठाकरे ईव्हीएम मशीन, मतचोरीवर बोलले. पण ते काहीच चालत नसल्यामुळे आता असे बोलत आहेत. पंचवीस वर्ष तुमचा महापौर होता, मुख्यमंत्रीपद होते, त्यावेळेस तुम्ही काय केले? असा सवाल बावनकुळे यांनी उपस्थित केला आहे.

बावनकुळे म्हणाले, तुम्हाला मुंबईचा खरेच विकास करायचा असेल तर व्हीजन डॉक्युमेंट द्या. त्यांच्याकडे काहीही प्लॅन नाही. त्यांना फक्त भावनात्मक बोलायचे आहे. डेव्हलपमेंट म्हणजे देवेंद्र फडणवीस आणि देवेंद्र फडणवीस म्हणजे डेव्हलपमेंट हाच फॉम्युर्ला चालणार असल्याचे बावनकुळे म्हणाले.

बावनकुळे म्हणाले, आमचा पक्ष आहे, पक्षाची शिस्त आहे. सर्वात मोठा पक्ष आहे. आतापर्यंत भाजप सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेले निर्णय केंद्र सरकारने पूर्ण केले आहेत. केंद्र सरकारचा निर्णय देवेंद्र फडणवीस पूर्ण करतात, काही ठिकाणी आमची मैत्रीपूर्ण लढत आहे. तसेच लोक आम्हाला मत देतील. विरोधी पक्ष किंचित झालेला दिसेल, असा टोलाही बावनकुळे यांनी लगावला.

## ही कार्यकर्त्यांची इच्छा..



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :
पुण्यात अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांची राष्ट्रवादी एकत्र आली आहे. या दोन्ही राष्ट्रवादींच्या युतीची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.
तसेच शरद पवारांची राष्ट्रवादी एनडीएमध्ये जाणार का? असा देखील प्रश्न अनेकांच्या मनात उपस्थित झाला आहे. यावर खासदार सुप्रिया सुळे यांनी खुलासा केला आहे.

सुळे म्हणाल्या, कार्यकर्त्यांची इच्छा, जे निवडणूक लढवणारे कार्यकर्ते होते, त्यातील ब?्याच कार्यकर्त्यांची ही इच्छा होती आणि ते एक टीमवर्क होते. याच टीमवर्कच्या माध्यमातून दोन्ही राष्ट्रवादीची युती झाली.

महापालिकेच्या निवडणुकीनंतर शरद पवारांची राष्ट्रवादी एनडीएबरोबर जाईल का? तसेच सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होतील आणि रोहित पवार राज्यात मंत्री होतील अशा चर्चा सुरू आहेत, यावर सुप्रिया सुळे म्हणाल्या, या चर्चा मी व्हॉट्सअप ग्रुपवर वाचल्या आहेत. मात्र, मी त्या चर्चांवर फार विचार करत नाही. जे माझ्या कामाच्या बाहेर आहे, त्याचा विचार मी कशाला करू? केंद्रात मंत्री होणार का? असा प्रश्न विचारला असता, सुप्रिया सुळे म्हणाल्या, याचे उत्तर माझ्याकडे नाही. मात्र, ११ वर्षांपासून मी चर्चा ऐकते. लोक बोलत असतात, पण आपण आपले काम करत राहायचे. बारामतीच्या लोकांनी खूप विश्वासाच्या नात्यांनी मला निवडून दिले आहे. त्यामुळे माझी पहिली जबाबदारी मतदारसंघातील मूलभूत सुविधा सोडवणे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

## माजी मंत्र्यांच्या मुलीसह तिघांचा मृत्यू



ट्रकमध्ये घुसली कार

■ वृत्तसंस्था, इंदूर, दि. ९ :
इंदूरमध्ये भरधाव वेगातील कार ट्रकमध्ये घुसली. या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला. मृतकांमध्ये माजी गृहमंत्री बाळा बच्चन यांची मुलगी प्रेरणा आणि काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते आनंद कासलीवाल यांचा मुलगा प्रखर यांचा समावेश आहे. कारमधील एक तरुणी गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

रालामंडल परिसरात शुक्रवारी सकाळी ५:१५ वाजता हा अपघात झाला. ग्रे रंगाच्या नेक्सन कारमध्ये प्रेरणा बच्चन, प्रखर कासलीवाल, मानसंधू आणि अनुष्का राठी हे चौघे जण होते. प्रखरचा वाढदिवस होता, चौघेही दारूच्या नशेत होते आणि कोको फार्ममध्ये वाढदिवसाची पार्टी साजरी करून इंदूरला परत येत होते.

कार प्रखर चालवत होता. नशेत असल्यामुळे कारवरील नियंत्रण सुटले आणि ती ट्रकमध्ये घुसली. या अपघातात प्रेरणा, प्रखर, मानसंधू यांचा जागीच मृत्यू झाला. अनुष्का जखमी झाली आहे. कारमध्ये दारूची बाटली सापडली आहे.

## १०२ खासदारांची संपत्ती दहा वर्षांत ११०% वाढली

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ९ :
2014 ते 2024 दरम्यान लोकसभेत पुन्हा निवडून आलेल्या 102 खासदारांच्या सरासरी संपत्तीत 110% वाढ झाली आहे. एडीआरच्या अहवालानुसार या खासदारांची सरासरी संपत्ती 2014 मध्ये 15.76 कोटी होती, जी 2024 मध्ये वाढून ?33.13 कोटी झाली.

महाराष्ट्रातील साताऱ्याचे भाजप खासदार उदयनराजे भोसले यांच्या संपत्तीत सर्वाधिक वाढ झाली आहे. 2014 मध्ये त्यांची संपत्ती 60 कोटी रुपये होती, जी 2024 मध्ये वाढून 223 कोटी रुपये झाली. म्हणजेच 10 वर्षांत त्यांच्या संपत्तीत 268% वाढ झाली.



उदयनराजे भोसले यांची सर्वाधिक

अहवालानुसार, सरासरी संपत्तीत टक्केवारीच्या आधारावर सर्वाधिक वाढ झामुमोमध्ये नोंदवली गेली. त्यांच्या खासदारांच्या संपत्तीत 804% वाढ झाली.

एआयएमआयएम दुसऱ्या स्थानावर राहिले, ज्यांच्या खासदारांच्या संपत्तीत 488% वाढ नोंदवली गेली. तिसऱ्या स्थानावर जदयू राहिले, जिथे सरासरी संपत्तीत 259% वाढ नोंदवली गेली.

गुजरातच्या जामनगरच्या भाजप खासदार पूनमबेन माडम यांच्या संपत्तीत 747% वाढ झाली आहे. मथुरेच्या भाजप खासदार हेमा मालिनी यांची संपत्ती 178 कोटींवरून वाढून 278 कोटी झाली. तृणमूलचे शत्रुघ्न सिन्हा यांची संपत्ती 131 कोटींवरून 210 कोटी झाली. म्हणजेच 78 कोटी वाढले.

## अपघातात एका मुलीसह ४ भाविक ठार

■ वृत्तसंस्था, तुमकुरू/कर्नाटक, दि. ९ :
कर्नाटकच्या तुमकुरु जिल्ह्यात शुक्रवारी पहाटे भीषण रस्ता अपघात झाला. भाविकांनी भरलेले एक टेम्पो ट्रॅव्हलर वाहन रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला धडकले. या अपघातात एका मुलीसह चार जणांचा जागीच मृत्यू झाला. सर्वजण सबरीमाला मंदिरातून परत येत होते.
धडकेमुळे टेम्पो ट्रॅव्हलर पूर्णपणे उद्धवस्त झाले. मृतांमध्ये साक्षी (७), व्यंकटेशप्पा (३०), मरटप्पा (३५) आणि गविसिद्धप्पा (४०) यांचा समावेश आहे. सर्व मृत कोप्पल जिल्ह्यातील रहिवासी होते.

## अजित पवार भाजपला उल्लू बनवत आहेत
# प्रकाश आंबेडकरांचा दावा



■ **सोलापूर :** वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी शरद व अजित पवार एकच असल्याचा दावा करत एकच खळबळ उडवून दिली आहे. शरद पवार व त्यांचे पुतणे अजित पवार एकच आहेत. ते सत्तेसाठी फक्त भाजपला उल्लू बनवत आहेत. सत्तेसाठी तत्वे बाजूला ठेवून वागत आहेत, असे ते म्हणालेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस सध्या सत्ताधारी महायुतीसोबत आहे. तर शरद पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीचा दुसरा गट सध्या विरोधी बाकावरील महाविकास आघाडीसोबत आहे. हे दोन्ही पक्ष एकमेकाविरोधात टीकाटिप्पणी कर असले तरी त्यांनी पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकेसाठी युती केली आहे. त्यांच्या युतीविषयी राजकीय वतुर्ळात वेगवेगळे तर्कवितर्क लढवले जात असताना प्रकाश आंबेडकरांनी दोन्ही पवार एकच असल्याचा दावा करून एकच खळबळ उडवून दिली आहे. प्रकाश आंबेडकर सोलापूर येथील आपल्या सभेत बोलताना म्हणाले, दोन्ही पवार एकच आहेत. त्यांनी भाजपला उल्लू बनवले आहे. चौकशीचे ससेमिरा मागे लागला म्हणून एक जण भाजपसोबत गेला. स्वतःची चौकशी थांबवली. आता एकजण डोळे दाखवत असताना दुसरा तुझी 70 हजार कोटींची फाईल पेंडिग असल्याची आठवण काढून देत आहे. आमचा भाजपला प्रश्न आहे, तुम्ही एवढे दिवस ही फाईल का दाबून ठेवली? याचा खुलासा करा.

# लाडक्या बहिणींना मकरसंक्रांतीची भेट

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
राज्यातील लाडक्या बहिणींसाठी येत्या काही दिवसांत मोठी खुशखबर मिळणार असल्याचा दावा सोशल मीडियावर जोर धरू लागला आहे. देवाभाऊंकडून लाडक्या बहिणींना मकरसंक्रांतीची मोठी भेट, अशा आशयाचे पोस्टर सध्या व्हॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्रामसह विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत. या पोस्टरमध्ये 14 जानेवारीपूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट तीन हजार रुपये जमा होतील, असा ठाम दावा करण्यात आला आहे. मात्र, या पोस्टरमुळे केवळ अपेक्षा वाढल्या नसून, राज्यातील राजकीय वातावरणही तापू लागले आहे.

विशेष म्हणजे, राज्यातील 29 महानगरपालिकांसाठी 15 जानेवारी रोजी मतदान होणार आहे. मतदानाच्या अगदी आदल्या दिवशी म्हणजे 14 जानेवारीला मकरसंक्रांत साजरी होत आहे. अशा वेळी सोशल मीडियावर पसरवण्यात येत असलेले हे पोस्टर आणि त्यामधील आर्थिक लाभाचे आश्वासन यामुळे निवडणूक आचारसंहितेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. महायुतीतील दोन घटकपक्षांच्या काही उमेदवारांकडून त्यांच्या अधिकृत तसेच वैयक्तिक सोशल मीडिया अकाऊंटवरून




### मकरसंक्रांती-निवडणूक जुळल्याने विरोधक आक्रमक

लाडक्या बहिणींच्या खात्यात 3 हजार रुपये जमा होणार असल्याचे दावे उघडपणे केले जात आहेत. त्यामुळे सरकारकडून मकरसंक्रांतीच्या दिवशी किंवा त्याआधी निधी वितरित झाला, तर तो आचारसंहितेचा भंग ठरणार नाही का, असा सवाल विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे.

या वादाच्या केंद्रस्थानी आलेले पोस्टर मुंबईतील वॉर्ड क्रमांक 2 मधून भाजपकडून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवार तेजस्वी घोसाळकर यांनी दोन दिवसांपूर्वी सोशल मीडियावर शेअर केले होते. त्यांच्या पोस्टमध्ये मकरसंक्रांतीच्या सणाशी जोडून सरकारच्या योजनेचे श्रेय घेतले गेले आहे. सण उत्साहाचा, क्षण मकरसंक्रांतीचा. मकरसंक्रांतीचा गोडवा अधिक वाढवण्यासाठी महायुती सरकारने राज्यातील आपल्या लाडक्या बहिणींना मोठी भेट दिली आहे, असे नमूद करत त्यांनी पुढे स्पष्टपणे लिहिले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत डिसेंबर आणि जानेवारी या दोन्ही महिन्यांचा हप्ता एकत्रितपणे म्हणजेच 3000 रुपये 14 जानेवारीपूर्वी सर्व पात्र भगिनींच्या खात्यात जमा होणार आहेत. या पोस्टमधून सरकारने बहिणींच्या चेहऱ्यावर हसू फुलवले, असा दावा देखील करण्यात आला आहे.

तेजस्वी घोसाळकर यांनी केवळ सोशल मीडियापुरतेच नव्हे, तर प्रचारादरम्यानही मुंबई महापालिका निवडणुकीच्या आधी लाडक्या बहिणींच्या खात्यावर 3 हजार रुपये जमा होतील, असा शब्द दिल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे हा केवळ माहितीपर संदेश आहे की थेट निवडणूक प्रचाराचा भाग आहे, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निवडणुकीच्या तोंडावर अशा प्रकारे सरकारी योजनेचा उल्लेख करत आर्थिक लाभाचे ठोस आश्वासन दिले जात असल्याने विरोधकांनी आक्षेप घेतला आहे.

# येरवडा कारागृहात कैद्याला बेदम मारहाण

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :**
येरवडा कारागृहात एका कैद्याला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. या मारहाणीत कैदी गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी एका कैद्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देवकरप्पा गराळे (वय ६५) असे जखमी कैद्याचे नाव आहे, त्यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कैदी फजिल अहमद अब्दुलकयुम अन्सारी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येरवडा कारागृहातील हवालदार प्रकाश भोसले यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिक्षा भोगत असलेले गराळे आणि अन्सारी यांना कारागृहातील चांगल्या वर्तणुकीमुळे खुल्या कारागृहात काम देण्यात आले होते. खुल्या कारागृहातील बराक क्रमांक एक परिसरात त्यांच्यात वाद झाला. या वादातून अन्सारीने गराळे यांच्या चेहऱ्यावर ठोसे मारले, ज्यामुळे गराळे फरशीवर पडून जखमी झाले.

मारहाणीत गराळे यांच्या मेंदूत रक्तस्त्राव झाल्याने त्यांची प्रकृती गंभीर आहे. त्यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू असून, पोलीस उपनिरीक्षक सी. बी. बेरड या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. गेल्या महिन्यात याच येरवडा कारागृहात एका कैद्याचा फरशीच्या तुकड्याने मारहाण केल्याने मृत्यू झाल्याची घटना ताजी आहे.

# लोकलला भीषण आग

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
मुंबई येथील कुर्ला आणि विद्याविहार रेल्वे स्थानाकादरम्यान कचरा उचलणाऱ्या लोकल ट्रेनला अचानक मोठी आग लागल्याची घटना घडली आहे. ऐन गर्दीच्या वेळी ही घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. या दुर्घटनेत लोकल ट्रेनचा एक संपूर्ण डब्बा जळाला असल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, कुर्ला येथील सायडिंगमध्ये उभ्या असलेल्या कचरा लोकल ट्रेनच्या दुसऱ्या डब्याला आग लागली आहे. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले आहे. अग्निशमन दलाच्या जवनांकडून आग विझवण्यासाठी शथीर्चे प्रयत्न केले. या घटनेमुळे सुरक्षेच्या कारणास्तव साधारण पावणे नऊ वाजल्यापासून अप स्लो लोकल मार्गावरील रेल्वे वाहतूक तात्पुरती बंद करण्यात आली आहे. यामुळे मध्य रेल्वेच्या विद्याविहार रेल्वे स्थानाकाकडून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या दिशेने जाणारी स्लो लोकल ट्रेन वाहतूक तात्पुरती बंद ठेवण्यात आली असल्याची माहिती आहे.

रेल्वे प्रशासनाकडून या घटनेची माहिती देण्यात आली असून या आगीची घटना 8 वाजून 38 मिनिटांनी समोर आली होती. यानंतर अवघ्या काही मिनिटांत अग्निशामक दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवले. 8 वाजून 55 मिनिटांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश आले.

# देशातील पहिल्या क्रॉस-बॉर्डर रोबोटिक शस्त्रक्रियेचा मान मुंबईला

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :**
भारतातील पहिली आंतरराष्ट्रीय रिमोट रोबोटिक शस्त्रक्रिया मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालामध्ये यशस्वीपणे पार पडली. मुंबईमध्ये ही शस्त्रक्रिया दोन रुग्णांवर करण्यात आली, तर युरो-ऑन्कोलॉजी आणि रोबोटिक शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. टी. बी. युवराजा यांनी ५००० किलोमीटर दूर असलेल्या शांघायमधून ही शस्त्रक्रिया केली. सेंट्रल ड्रग्स स्टॅन्डर्ड कंट्रोल ऑर्गनायजेशनकडून मंजुरी मिळाल्यानंतर तौमाई रिमोट रोबोटिक सर्जरी सिस्टीमच्या माध्यमातून ही शस्त्रक्रिया करण्यात आली.



मुंबईमध्ये दोन रुग्णांवर रोबोटच्या मदतीने रॅडिकल प्रोस्टेटेक्टॉमी आणि पार्शियल नेफ्रेक्टॉमी या शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या. गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांसाठी दूरुन रोबोटिक वापर सुरक्षितपणे, अचूकपणे आणि विश्वसनीय पद्धतीने करता येतो हे यातून सिद्ध झाले. दोन्ही शस्त्रक्रिया तौमाई प्रणालीचा वापर करून रिमोट पद्धतीने करण्यात आल्या. सध्या टेली-सर्जरीसाठी यूएस एफडीए स्टडीद्वारे मंजुरी मिळालेला एकमेव रोबोटिक सर्जिकल प्लॅटफॉर्म आहे. या शस्त्रक्रियांनी तौमाई प्रणालीने सुरक्षेच्या बाबतीत काहीही तडजोड न करता, अचूकता दाखवत भौगोलिक अंतर खूप जास्त असतानाही यश मिळाले.

या आंतरराष्ट्रीय सर्जरी हाय-स्पीड, स्थिर डेटा ट्रान्समिशन आणि अनेक सुरक्षित तंत्रज्ञानामुळे शक्य झाल्या. या सिस्टीमने फक्त १३२ मिलीसेकंदाच्या अल्ट्रा-लो बायडायरेक्शनल लॅटेन्सीसह वास्तविक वेळेत यशस्वीरित्या शस्त्रक्रिया पार पडली. अतिशय कमी लॅटेन्सीमुळे शस्त्रक्रियेदरम्यान उपकरणांची सुरळीत हालचाल, अचूक डिसेक्शन आणि विश्वसनीय अंमलबजावणी शक्य झाली. कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयामधील युरो-ऑन्कोलॉजी आणि रोबोटिक शस्त्रक्रियेचे संचालक (ग्रुप) डॉ. टी. बी. युवराजा यांनी यापूर्वी ४१०० पेक्षा जास्त रोबोटिक शस्त्रक्रिया केल्या आहेत. दोन मोठ्या देशांमध्ये यशस्वीपणे शस्त्रक्रिया पूर्ण केल्यामुळे कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयाची नावीन्यता, रुग्णांची सुरक्षा आणि उत्कृष्ट देखभाल यांच्याप्रती बांधिलकी अधिक जास्त मजबूत झाली.

# एक दिवस हिजाब घालणारी महिला पंतप्रधान बनेल



■ **सोलापूर :** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामुळे एक दिवस हिजाब घालणारी महिलाही भारताची पंतप्रधान होईल, असा ठाम विश्वास एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी शुक्रवारी येथील एका सभेत बोलताना व्यक्त केला. यावेळी त्यांनी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्यावरही निशाणा साधला. अजित पवारांना मत म्हणजे नरेंद्र मोदींना मत. राष्ट्रवादीला मत म्हणजे मोदींनी आणलेल्या वक्फ कायद्याला पाठिंबा, असे ते म्हणाले. सोलापूरचे एमआयएमचे माजी शहराध्यक्ष तौफिक शेख यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ते सध्या राष्ट्रवादीकडून निवडणुकीच्या मैदानात आहेत. असदुद्दीन ओवैसी यांनी शुक्रवारी त्यांच्याविरोधात सभा घेतली. यावेळी भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसचा खरपूस समाचार घेतला. तसेच एक दिवस हिजाब घालणारी महिला या देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान होईल असा ठाम विश्वास व्यक्त केला. ओवैसी म्हणाले, आपण सोलापूरला पुण्यासारखे सुंदर बनवू शकतो. भाजपचे लोक इथे एवढ्या वर्षांपासून राहत आहेत. पण काहीच करत नाहीत. पाकिस्तानच्या राज्यघटनेत एकाच धमार्चा माणूस राष्ट्राध्यक्ष होऊ शकतो असे नमूद आहे.

# ठाण्याच्या मीनाक्षी शिंदेंचे आक्षेपार्ह वक्तव्य

■ **महासागर प्रतिनिधी, ठाणे, दि. ९ :**
आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापल्याचे बघायला मिळत आहे. ठाणे महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटातील बंडखोरीमुळे मानपाडा, कोलशेत या भागातील प्रभाग क्रमांक 3 मधील निवडणुकीकडे सर्वांचेच लक्ष आहे. असे असतानाच, या प्रभागातून निवडणूक लढवणाऱ्या शिवसेना शिंदे गटाच्या ठाणे महिला जिल्हा प्रमुख व माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांचा एक व्हिडिओ व्हारल झाला असून त्यात आगरी समजाविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करत पोलिस कारवाईच्या धमक्या दिल्याचे समजते. या संदभार्तील एक ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल झाली आहे.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या ऑडिओ क्लिपमधील संभाषणात मीनाक्षी शिंदे यांनी आगरी समजाविषयी आक्षेपार्ह विधान करत अपमानास्पद शब्द वापरण्यात आल्याचे ऐकू येत आहे. मीनाक्षी शिंदे यांच्या या ऑडिओ क्लिपमुळे आगरी समाजात नाराजीचा सूर उमटला असून याचा जाहीर निषेध केला जात आहे.

मीनाक्षी शिंदे यांच्या ऑडिओ क्लिपचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यासोबत एक संदेशही लिहिण्यात आला आहे. पायाखालची जमीन खचली आहे म्हणून धमक्यांची भाषा केली जात आहे.

## बेस्टच्या भल्यासाठी कामगारांच्या राजकीय पक्षांकडे मागण्या

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :**
मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या बेस्ट सारख्या सार्वजनिक परिवहन सेवेची सध्याची अवस्था ही अत्यंत दयनीय असून आजवर बेस्ट सारख्या संघटनेचे नेतृत्व करणाऱ्या अनेक समित्यांनी बेस्ट कामगारांच्या विविध मागण्यांसंदर्भात कायम आवाज उठवला आहे. बेस्ट कडे असलेल्या स्व मालकीच्या अत्यंत कमी बस,त्यामुळेच प्रवाशांची होणारी आबाळ, कंत्राटी पद्धतीने बेस्ट कामगारांची भरती करून कायम स्वरुपी कामगारांना स्वेच्छेने दिली जाणारी निवृत्ती, बेस्ट मालकीच्या जमिनीची खाजगी विक्री, बेस्टची अवस्था ही दयनीय आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी राजकीय नेत्यांच्या पटलावर येण्यासाठी बेस्ट संयुक्त कामगार कृती समितीद्वारे जाणीवपूर्वक.प्रयत्न केले जात आहेत.

# भाजप एक नंबरचा ढोंगी



### राऊतांची घणाघाती टीका

**मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असताना, शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार हल्लाबोल केला आहे. अंबरनाथ महापालिकेतील घडामोडींचा संदर्भ देत राऊत यांनी भाजपच्या भूमिकेला ढोंगीपणाचं उदाहरण ठरवत तीव्र शब्दांत टीका केली. भाजपवाले एक नंबरचे बनचुके आणि ढोंगी लोक आहेत, असे स्पष्टपणे म्हणत त्यांनी भाजपवर दुटप्पी राजकारणाचा आरोप केला.

भाजप सार्वजनिकपणे काँग्रेस आणि एमआयएमवर टीका करत असताना, प्रत्यक्षात मात्र सत्तेसाठी त्यांच्याशीच हातमिळवणी करत असल्याचा दावा राऊत यांनी केला. अंबरनाथ प्रकरणावर भाष्य करताना संजय राऊत म्हणाले की, भाजपने अंबरनाथमध्ये काँग्रेस-एमआयएमशी युती केल्याचा ठपका ठेवत कारवाई केल्याचे दाखवले. मात्र, काँग्रेसने संबंधित नगरसेवकांवर निलंबनाची कारवाई करताच, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी त्याच नगरसेवकांवर ससाण्यासारखी झडप घातली, असा आरोप त्यांनी केला. का ही धावपळ? कारण ते काँग्रेसच्या विचारांचे लोक आहेत, असा टोला लगावत राऊत यांनी भाजपची खरी भूमिका उघडी पाडली.

फक्त अंबरनाथच नव्हे, तर अकोटमध्येही भाजप एमआयएमच्या निलंबित लोकांना सोबत घेऊन सत्ता स्थापन करत असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला. एकीकडे एमआयएमविरोधात बोलायचं आणि दुसरीकडे सत्तेसाठी त्यांच्याच मदतीने सत्ता मिळवायची, हा भाजपचा दुहेरी चेहरा असल्याचं त्यांनी ठामपणे सांगितलं.

# निसर्ग राज्यस्तरीय प्रातिनिधिक मराठी काव्यसंग्रह प्रकाशीत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती करण्यासाठी संपादक प्रा.डॉ.सत्येंद्र राऊत, दीपमाला खडके, ऐश्वर्या कदम यांनी राज्यभरातून १३५ कवींच्या दर्जेदार काव्यरचनांना एक समान व्यासपीठ उपलब्ध करुन हा राज्यातील पहिलाच १६० पानांचा निसर्ग प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित केला आहे. या काव्यसंग्रहात विविध शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांचे आणि सिने कलावंताचे शुभेच्छा संदेश आहेत. या काव्यसंग्रहाला 978-93-482139-2-1 प्राप्त असून या काव्यसंग्रहात जैवविविधता, नदी, माती, जंगल संरक्षण, प्रदूषण, हवामान बदल, ऋतुचक्र, श्रावणसरी, पाऊस वर्णन, पर्वत, समुद्र अशा विविध विषय छटा हाताळणाऱ्या निसर्गाच्या विविध रुपांचे वर्णन आणि संवेदनाचे व संरक्षणाचे संदेश यातील काव्यरचनांमधून प्रभावीपणे व्यक्त करण्यात आले आहेत.

या नवीन साहित्यकृतींमुळे पर्यावरणा विषयीची तरुण पिढीमध्ये जागरुकता आणि सर्जनशीलता निर्माण होईल. या निसर्ग काव्यसंपदेचा उपयोग शाळा, महाविद्यालयांमध्ये पर्यावरण शिक्षणासाठी




आणि विविध पर्यावरण उपक्रमांसाठी प्रेरणादायी म्हणूनही उपयोगी ठरेल. पर्यावरण रक्षण, निसर्गाशी नाते दृढ करणारा हा निसर्ग राज्यस्तरीय प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रत्येक रसिक वाचकांना अवश्य आवडेल.

आणि मानवी हृदयाचा ठाव घेणारा हा काव्यसंग्रह ठरेल. हा प्रथमावृत्ती असणारा काव्यसंग्रह प्रा.डॉ. सत्येंद्र राऊत तुळजापूर यांच्याकडे उपलब्ध आहे. आत्ताच या "निसर्ग" राज्यस्तरीय प्रातिनिधिक मराठी काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा, निलंगा - जिल्हा लातूर येथे साग्रसंगीत पार पडला.

# भाजपने परवानगी दिली तर शिंदेंचा टांगा पलटी करेन

■ **महासागर प्रतिनिधी, नवी मुंबई, दि. ९ :**
आगामी महापालिकेच्या निवडणुकीत महायुती बहुतांश ठिकाणी एकत्रच लढत असली, तर काही ठिकाणी मात्र स्वबळावर लढत आहे. पुण्यात अजित पवारांची राष्ट्रवादी स्वबळावर लढत आहे, तर नवी मुंबई महापालिकेत शिवसेना शिंदे गट आणि भाजप स्वबळावर लढत आहेत. येथील निवडणूक ही एकनाथ शिंदे विरुद्ध गणेश नाईक अशी रंगणार आहे.

भाजपने परवानगी दिली तर एकनाथ शिंदेंचा टांगा पलटी करून घोडे बेपत्ता करेन, असे म्हणत थेट आव्हानच दिले आहे. नवी मुंबईत शिवसेना शिंदे गट विरुद्ध भाजप असा सामना रंगला आहे. गणेश नाईक



आणि शिंदे गटात गेल्या काही दिवसांपासून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई शहरात सुरू केलेल्या 'नवी मुंबई, नवे सरकार' या प्रचाराला 'नवी मुंबईकरांसाठी जुनं तेच सोनं' असल्याचे प्रत्युत्तर गणेश नाईक यांनी दिले.

## जीपच्या धडकेत महिलेचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :**
पुण्यातील वडगाव बुद्रुक परिसरात भरधाव जीपच्या धडकेत दुचाकीवरील सहप्रवासी महिलेचा मृत्यू झाला आहे. या अपघातात दुचाकीस्वार महिला गंभीर जखमी झाली असून, पोलिसांनी आरोपी जीपचालकाला अटक केली आहे. प्रतिभा दत्तात्रय घडशी (वय ५५, रा. धबाडी, आंबेगाव बुद्रुक, पुणे) असे मृत महिलेचे नाव आहे. अपघातात दुचाकी चालवणाऱ्या मंगला अशोक काकडे (वय ६०, रा. श्री दत्त संस्कृती रेसीडन्सी, धबाडी, पुणे) या जखमी झाल्या आहेत.

याप्रकरणी जीपचालक राजकुमार ज्ञानेबा राजपंगे (वय ३८, रा. श्री भैरवनाथ मंदिराजवळ, वडगाव बुद्रुक, पुणे) याला अटक करण्यात आली आहे. मंगला काकडे यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात फिर्याद दिली आहे.

# ११ वाहनांचा विचित्र अपघात
### ४ जण जखमी, कंटेनर चालक पसार



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
घोडबंदर येतील गायमुख घाटाच्या उतरणीवर शुक्रवारी सकाळी एक-दोन नव्हे तर तब्बल 11 वाहनांचा विचित्र अपघात झाला. सिमेंट वाहतूक करणाऱ्या कंटेनरमुळे हा अपघात झाला. यामुळे या मार्गावर वाहनांची मोठी कोंडी झाली. दरम्यान, या घटनेत 4 हून अधिक जण जखमी झाले असून, कंटेनर चालक फरार झाला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, टाटा कंपनीचा कंटेनर (एमएच 04 केएफ 0793) शुक्रवारी सकाळी 7 च्या सुमारास घोडबंदर स्थित गायमुख घाट उतरून ठाण्याच्या दिशेने येत होते. तब्बल 35 ते 40 टन सिमेंट वाहून नेणाऱ्या या कंटेनरवरील चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे कंटेनरने समोरून येणाऱ्या वाहनांना जोरदार धडक दिली. या अपघातानंतर कंटेनर चालक घटनास्थळावरून फरार झाला. त्यानंतर सकाळी 7.45 वा. या घटनेची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना लगतच्या रुग्णालयात हलवले.

या अपघातामुळे गायमुख घाट ते वसई खाडी पुलापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. जखमींमध्ये रिक्षाचालक शिवकुमार यादव (56) यांच्या डोक्याला मार लागला आहे. तर तस्किन शेख (45) व अनिता पेरवाल (45) या 2 महिला प्रवाशांनाही जबर दुखापत झाली आहे. कारचालक रामबली, बाबूलाल (22) यांच्याही कंबरेला या अपघातात गंभीर दुखापत झाली आहे. सर्व जखमींना ओवळा येथील टायटन रुग्णालयात दाखल करम्यात आले आहे. इतर काही वाहनांतील प्रवाशांना किरकोळ दुखापत झाल्यामुळे त्यांनी खासगी रुग्णालयात उपचार घेतल्याची माहिती कासारवडवली पोलिसांनी दिली. या अपघातात होंडा सिटी, व्हॅगनार, इर्टिगा, महिंद्रा, इनोवा, डिझायर, ब्रेझा, फोर्ड कार तसेच ऑटो रिक्षा अशा एकूण 11 वाहनांचे नुकसान झाले आहे. काही वाहनांचे पुढील व मागील भागाचा अक्षरशः चुराडा झाला आहे. अपघातग्रस्त वाहनांमधून रस्त्यावर ऑईल सांडल्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली होती.

## पुण्यात कुत्र्यावर जगातील पहिली कॅथलॅब एम्बोलायझेशन प्रक्रिया
# २.५ किलो ट्युमर ७० टक्के घटला

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :**
पुण्यातील द स्मॉल ॲनिमल क्लिनिकमध्ये यकृत आणि प्लीहाच्या मोठ्या ट्युमरने ग्रस्त असलेल्या १३ वर्षीय कुत्र्यावर जगातील पहिली यशस्वी कॅथलॅब एम्बोलायझेशन प्रक्रिया पार पडली आहे. या विनाशस्त्रक्रियेमुळे तब्बल २.५ किलो वजनाची गाठ लक्षणीयरीत्या कमी करण्यात डॉक्टरांना यश आले आहे.

'मफिन झोरे' नावाच्या या लॅब्राडोर कुत्र्याला (नर) गेल्या काही महिन्यांपासून गंभीर ॲनिमिया, प्लेटलेट्सची तीव्र



कमतरता, श्वास घेण्यास त्रास आणि पोटात मोठी गाठ अशा लक्षणांनी ग्रासले होते. वैद्यकीय तपासणीत त्याचे हिमोग्लोबिन अवघे ३.५ आणि प्लेटलेट्स केवळ ३० हजार असल्याचे समोर आले. अल्ट्रासाऊंड व सीटी स्कॅनमध्ये यकृत व प्लीहेत मोठ्या कर्करोगाच्या गाठी असल्याचे निदान झाले.

पारंपरिक खुल्या शस्त्रक्रियेमुळे जीवघेणा रक्तस्त्राव होण्याचा धोका लक्षात घेता, पशुवैद्यकीय सर्जन डॉ. नरेंद्र परदेशी आणि त्यांच्या टीमने किमान आक्रमक कॅथलॅब एम्बोलायझेशन करण्याचा निर्णय घेतला. व्हॅस्क्युलर सर्जन डॉ. धर्मेश गांधी, इंटरव्हेंशनल रेडिओलॉजिस्ट डॉ. किरण नाईकनवरे आणि कॅथलॅब टीमच्या सहकार्याने ही प्रक्रिया यशस्वी करण्यात आली.

या प्रक्रियेत, फेमोरल धमनीतून मायक्रो-कॅथेटरद्वारे गाठींना रक्तपुरवठा करणाऱ्या धमन्या बंद करण्यात आल्या. यामुळे गाठीचा रक्तपुरवठा थांबला आणि तिचा आकार हळूहळू कमी होऊ लागला. प्रक्रियेनंतर अवघ्या ४८ तासांत मफिनच्या हिमोग्लोबिन पातळीत सुधारणा दिसून आली. पंधरा दिवसांत गाठीचा आकार ७० टक्क्यांहून अधिक कमी झाला. सध्या मफिनची प्रकृती स्थिर असून, तो पुन्हा सक्रिय जीवन जगत आहे. या दुर्मिळ यशस्वी उपचारामुळे पशुवैद्यकीय क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे.

महासागर ●शनिवार,दि.१० जानेवारी २०२६

अकोला पान ३

# वीर वैभव लहाने यांना मानवंदना शासकीय इतमामात अंत्यसंस्कार



■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■ देशसेवेत कर्तव्य बजावत असताना अकोला जिल्ह्यातील सेवारत सैनिक नायक वैभव श्रीकृष्ण लहाने यांना वीरमरण आले. ते १२ मराठा लाइट इन्फंट्री या युनिटमध्ये कार्यरत होते. त्यांच्या मूळ गावी कपिलेश्वर येथे सैनिकी व शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.शहिद लहाने हे जम्मू काश्मिरमध्ये कुपवाडा सेक्टर मध्ये कार्यरत होते.

प्रशासनाच्या वतीने तहसीलदार कुणाल झाल्टे, मराठा लाईट इन्फ्रंट्रीचे सीएचएम रामेश्वर पाटील, वैभव लहाने यांच्या कुटुंबियांनी पुष्पचक्र अर्पण केले.यावेळी सैनिकी विभागाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. पोलीस विभागाच्या वतीने बंदुकीच्या तीन फैरी झाडून सलामी देण्यात आली.

'भारत माता की जय', 'शहिद जवान अमर रहे' अशा घोषणा देत हजारो नागरिक वीर वैभव लहाने यांना निरोप देण्यासाठी उपस्थित होते.

# अधिकाधिक विकासकामांचा समावेश करा परिपूर्ण आराखडा सादर करा



■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■ जल्ह्यात २०२६-२७ मधील अपेक्षित कामांबाबत आराखडा अनेक कार्यालयांकडून अद्यापही प्राप्त नाही. आवश्यक, तसेच दीर्घकालीन विकास डोळ्यांसमोर ठेवून अधिकाधिक कामांचा समावेश व्हावा व परिपूर्ण आराखडा तत्काळ सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.जिल्हा वार्षिक योजना आराखडा, यापूर्वीच्या कामांवर झालेला खर्च, प्रगतीतील कामे आदी विविध विषयांचा आढावा जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत महसूल सभागृहातील बैठकीत घेण्यात आला,

## ■जिल्हाधिकाऱ्यांचे यंत्रणांना निर्देश

त्यावेळी त्या बोलत होत्या. जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, कामांची आवश्यकता व दीर्घकालीन विकास, उपयुक्तता आदी बाबी लक्षात घेऊन परिपूर्ण आराखडा सर्व विभागांनी तत्काळ सादर करावा. यापूर्वीच्या कामांची प्रगती, पूर्ण झालेल्या कामांचे जिओ टॅगिंग छायाचित्रे सादर करण्यात यावे.प्रगतीपथावर जी कामे सुरू आहेत, ती वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. स्पिल निधीच्या मागण्या सर्व यंत्रणांनी तत्काळ करणे आवश्यक आहे. कुठलाही निधी अखर्चित राहता कामा नये. जिल्ह्यात जास्तीत जास्त विकासकामे होणे आवश्यक आहे. कामे अपूर्ण राहणे, निधी अखर्चित राहणे असे प्रकार घडल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

सार्वजनिक आरोग्य, ग्रामीण रस्ते, पाटबंधारे, पशुसंवर्धन, मृद व जलसंधारण, महावितरण यासह विविध विभागांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उद्या अकोल्यात !

■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■ अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या. पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी-राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या उमेदवारांच्या प्रचाराला वेग आला असून, राज्याचे महसूल मंत्री व भाजपचे निवडणूक प्रभारी चंद्रशेखर बावनकुळे हे शनिवार, १० जानेवारी रोजी अकोल्यात दोन जाहीर सभांना संबोधित करणार आहेत. श्री राजराजेश्वर नगरीत होणाऱ्या या प्रचार दौऱ्यात जुने शहरातील राठोड पंच बंगला परिसरात पहिली जाहीर सभा तसेच, शिवाजी पार्क येथे दुसरी जाहीर सभा अशा दोन ठिकाणी नामदार बावनकुळे यांचे जोरदार मार्गदर्शन होणार आहे.

# मुद्देमालासह पळ काढणाऱ्या आरोपीस अटक

■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■ अकोला जिल्हयात मागील काही महीण्यापासुन पो स्टे अंर्तगत व शहरात बरेच दुकानातुन नगदी रक्कम चोरून पळ काढल्याचे गुन्हे घडत असल्याने मा. श्री. अर्चित चांडक, पोलीस अधिक्षक साहेब, अकोला यांनी दुकानातुन नगदी रक्कम चोरून पळ काढल्याच्या आरोपीताचा शोध करणेबाबत संबंधीत पोलीस स्टेशनला सुचीत केले होते.दि. ०८/०१/२०२६ रोजी पोलीस स्टेशन रामदासपेठ, अकोला येथे फिर्यादी नामे केतन शांतीलाल ठक्कर वय ४१ वर्षे, रा. दगडीपुल जापान जिन अकोला यांनी दिलेल्या जबानी रिर्पोट वरून पो स्टे ला अप क ०६ / २६ कलम ३०३ (२) इछड अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयामध्ये फिर्यादी यांचे दुकानातुन एक इसम याने फिर्यादी याचे दुकानातुन नगदी रक्कम चोरून पळ काटुन पळुन गेला.सदर गुन्हयामध्ये वरीष्ठानी दिलेल्या सुचना, तांत्रीक बाबी व गुप्त बातमीदार याचे मदतीने सदर गुन्हयात आरोपी नामे (१) देवा विनोद खंडारे वय २० वर्ष (२) गोपाल विजय अंभोरे वय २२ वर्ष



दोन्ही रा. सरस्वती विदायलय पाठीमागे, नित्यानंद नगर, संत तुकाराम हॉस्पीटल चौक, गौरक्षण रोड अकोला ज्यास पो स्टे चे विशेष पथक व्दारे संत तुकाराम चौक, अकोला येथून ताब्यात घेवुन गुन्हे संबंधाने विचारपुस केली असता त्यानी सदरचा गुन्हा आम्हीच केल्याची कबुली दिली तसेच त्याचे अंगझडतीत एकुण नगदी रोख रक्कम १५,५००/- रू व एक मोटर सायकल कि.अं. ६०,०००/- रू असा एकुण ७५,५००/- चा मुददेमाल जप्त करून गुन्हा उघडकीस आण्यात आला आहे.

## रविवारी प्रमिलाताई सभागृहात कथ्थक नृत्यांगना राधिका साठे यांचा नृत्य छंद कार्यक्रम



■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■ सांस्कृतिक व शास्त्रीय कथक नृत्य कार्यात सदा सक्रिय असणाऱ्या विदर्भातील ख्यातनाम कथ्थक नृत्यांगना राधिका साठे यांच्या स्थानीय कथक नृत्य मंदिर या संस्थेच्या वतीने महानगरात नृत्यछंद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दिनांक ११ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता स्थानिक प्रमिलाताई ओक सभागृहात कथ्थक नृत्यांगना राधिका साठे यांच्या विद्यार्थिनी कथ्थक नृत्यांचे अनेक अविष्कार सादर करणार आहेत. यात कथ्थक नृत्यागणा राधिका साठे यांची नृत्य झलकी ही श्रोत्यांना बघावयास मिळणार आहे.

या नृत्य कार्यक्रमात तबल्यावर मनीष हुंडेकर, गायन घननिळ पाटील तथा हार्मोनियमवर मनोज राऊत हे साथ संगत करणार आहेत. महानगरातील कला रसिकांनी या कार्यक्रमाचा आवर्जून लाभ घ्यावा असे आवाहन कथ्थक नृत्य मंदिर अकोला च्या वतीने करण्यात आले आहे.

# अवैध गावठी दारू निर्मिती विक्री करणाऱ्यां विरुद्ध 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत कारवाई

■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■ अकोला पोलीस दलामार्फत जिल्ह्यातील अवैध गावठी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यां विरुद्ध 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत विशेष मोहीम राबविण्यात आली. मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०८.०१.२०२६ चे सकाळी १२.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ही मोहीम प्रभावीपणे पार पडली. या विशेष मोहिमेत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांतील पोलीस पथकांनी एकूण ८५ ठिकाणी कारवाई केली आहे. कारवाईदरम्यान सुमारे ९,६८,९९० /- रुपये किमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला, तर अवैध धंद्यात सामील असलेल्यांवर आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. तसेच स्थानिक गुन्हे शाखेने स्वतंत्रपणे ०१ ठिकाणी छापा टाकत अवैध दारू विक्री व निर्माण करणाऱ्या ठिकाणांवर धडक देवुन २० लिटर गावठी दारू व २८५ लिटर सडवा मोहमाच एकुण किंमत ४६,७५०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला अशा प्रकारे अकोला जिल्हा



पोलिसांनी एकूण ८५ केसेस करून ९,६८,९९०/- रुपयांच्या अवैध दारू साहित्यावर कारवाई केली आहे. अवैध गावठी दारू उत्पादनामुळे जनतेच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होवुन व शांतता भंग होते. या पार्श्वभूमीवर अकोला पोलिस दलाने अशा अवैध धंद्यावर कठोर कारवाई करताना जनतेचा विश्वास कायम ठेवला आहे. पुढील काळात अशा प्रकारच्या अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी या पुढे सुध्दा नेहमी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने कळिवले आहे.

# हरभऱ्यावरील घाटेअळीचे एकात्मिक व्यवस्थापन

**अकोला** : सद्य:स्थितीत हरभऱ्याचे पीक बहुतांश ठिकाणी फुलोरा अवस्थेत आहे. या दरम्यान या पिकावर घाटे अळीच्या प्रादुर्भावाची शक्यता आहे. घाटेअळीच्या एकात्मिक व्यवस्थापनाबाबत जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालयातर्फे सूचना प्रसारित करण्यात आल्या आहेत. घाटे अळी ही हरभरा पिकाची प्रमुख किड असुन या किडींची मादी पतंग पानावर, कोवळया शेंड्यांवर, कळयांवर व फुलांवर एकेरी अंडी घालते. ही अंडी खसखसीच्या दाण्यासारखी दिसतात. त्यातून २ ते ३ दिवसात अळी बाहेर पडते.

ही अळी पानावरील हरितद्रव्य खरडून खाते. त्यामुळे पाने प्रथम पिवळसर पांढूरकी होऊन वाळतात व गळून पडतात. थोडया मोठ्या झालेल्या अळया संपूर्ण पाने व कोवळी देठे खाऊन फस्त करतात. त्यामुळे झाडावर फक्त फांदयाच शिल्लक राहतात. पुढे पिक फुलो-यावर आल्यावर हया अळीचा प्रादुर्भाव वाढतो व अळया प्रामुख्याने फुले व घाटयांचे नुकसान करतात. मोठ्या झालेल्या अळया घाटयाला छिद्र करून आतील दाणे खाऊन घाटे पोखरतात. एक अळी साधारणतः ३०-४० घाटयांचे नुकसान करते.

# विद्यार्थ्यांनी सादर केले अंधश्रद्धा निर्मूलन, नशामुक्ती व हेल्मेट वापराचे प्रभावी संदेश



■मुर्तिजापुर,दि.९ (प्रतिनिधी)■ मुर्तीजापुर तालुक्यातील माना पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस स्थापना दिवसाच्या वर्धापन दिन सप्ताहानिमित्त ग्राम कुरुम येथील इतवारा चौकात आज, ०८ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ४ ते ५ वाजेपर्यंत जनजागृती पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. ठाणेदार गणेश नावकार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात पंचशील हायस्कूल, कुरुम येथील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी समाजप्रबोधनपर पथनाट्य सादर केले.सदर पथनाट्यातून अंधश्रद्धा निर्मूलन, नशामुक्ती तसेच दुचाकी वाहन चालविताना हेल्मेट वापरण्याचे महत्त्व प्रभावी पद्धतीने मांडले गेले. नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थितांनी असे मत व्यक्त केले की, असे उपक्रम समाजात कायदा, नियम व सुरक्षिततेबाबत सकारात्मक संदेश पोहोचवतात आणि नागरिकांना सजग करतात. माना पोलीस स्टेशनच्या या उपक्रमामुळे स्थानिक समाजात नियमपालन आणि सार्वजनिक सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढण्यास मोठा हातभार लागला आहे.

# सपोर्ट पर्सन अमरावती विभागाची कार्यशाळा संपन्न



■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■ महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अकोला यांचे संयुक्त विद्यमाने अमरावती विभागातील सपोर्ट पर्सन यांची कार्यशाळा दिनांक ०७/०१/२०२५ रोजी महिला व बाल विकास भवन येथे संपन्न झाली पॉक्सो प्रकरणात सपोर्ट पर्सन ची भूमिका हि फार महत्वपूर्ण असते त्यामुळे सपोर्ट पर्सन चे कर्तव्य आणि जबाबदारी याची परिपूर्ण माहिती व्हावी या करिता अमरावती विभागातील सपोर्ट पर्सन ची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अकोला श्रीमती रोशनी बन्सल यांनी यांनी केले .या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून अँड संजय सेंगर माजी सदस्य बाल हक्क संरक्षण आयोग, अँड अनिता गुरव अध्यक्ष बाल कल्याण समिती अकोला अँड. नितेंद्र उंबरकर लोक अभिरक्षक अकोला, डॉ. यजनीश दंदेले म ानसोपचार तज्ञ अकोला, वी. इशरत खान स्त्री रोग तज्ञ जिल्हा रुग्णालय अकोला श्री विलास पांडुरंग बाविस्कर सेवा निवृत्त पोलीस अधिकारी आणि डॉ. जगदीश खांडेतोड जिल्हा सामान्य रुग्णालय अकोला,श्रीमती राजश्री कोलखेडे जिल्हा कार्यक्रम अधिकारी अकोला, श्री गिरीश पुसदकर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अकोला श्री राजू लाडूलकर जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अकोला हे लाभले होते या कार्यशाळेत सी.आर. पी.सी १६४, भा.न्या संहिता १८३, बालकांचे समुपदेशन, बालकल्याण समिती व सपोर्ट पर्सन ची भूमिका विशेष बालकांचे उपचार, बाल लैंगिक अत्याचार अधिनियम २०१२, ` कार्यशाळेचे प्रास्ताविक श्री गिरीश पुसदकर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले तर सूत्र संचालन आणि आभार प्रदर्शन हर्षाली गजभिये यांनी केले कार्यशाळेत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, सखी वन स्टॉप सेंटर, बालगृहाचे अधीक्षक चाईल्ड हेल्प लाईन, सुखाय फाउंडेशन, एन्करेज फाउंडेशन आय एस डब्लू एस, तीक्षणगत संस्था अकोला चे कर्मचारी उपस्थित होते अमरावती विभागातील ६५ सपोर्ट पर्सन कार्यशाळेकरीता उपस्थित होते.

## थोडक्यात

### शहरात नायलॉन मांजाची खुलेआम विक्री

**तेल्हारा** : संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या आकाशात रंगीबेरंगी पतंगांची उधळण सुरू झाली आहे. परंतु या रंगीत उत्पबाखाली प्राणघातक सावनी पसरत चालली आहे. बंदी असलेला नायलॉनम्हणजेच 'चायनीज मांजा', प्रशासनाच्या बंदीनंतरही शहरात खुलेआम विकला जात असल्याचे दिसून येत आहे. शहरातील मोचिपुरा परिसरातून मांचा विक्री होत आहे. राज्यात चायनीज मांजाची विक्रीवर बंदी असूनही शहरातील अनेक भागात राजरोसपणे मांजाची विक्री सुरू आहे. शहरात माहितीनुसार, एकरिल ७०० ते ९०० रुपयात विकला जातो.

### शिक्षिकेच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर नोंद

अकोला : सामाजिक न्याय विभाग अंतर्गत, बाळापूर तालुक्यातील शेळद येथील मुलींची शासकीय निवासी शाळा येथील प्रभारी मुख्याध्यापिका सीमा राजेश वाठुरकर यांनी नुकत्याच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील निपा व मिपा अंतर्गत आयोजित 'शालेय नेतृत्व विकास' या विषयावर झालेल्या मुख्याध्यापकांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे चर्चासत्रात सहभाग नोंदवून प्रभावी प्रेझेंटेशन सादर केले.

# पीएनजी ज्वेलर्सतर्फे 'चेन अँड बँगल्स महोत्सव'

## ग्राहकांसाठी खास सवलतींचा वर्षाव

■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■ भारतातील विश्वासार्ह आणि वारसाहक्क लाभलेला दागिन्यांचा प्रतिष्ठित ब्रँड, 'पीएनजी ज्वेलर्स'ने २०२६ या नववर्षाचे स्वागत आपल्या बहुप्रतिक्षित 'चेन अँड बँगल्स महोत्सवा'ने अतिशय दिमाखात केले आहे. ५ जानेवारी २०२६ पासून देशभरात सुरू झालेल्या या महोत्सवामुळे ग्राहकांना सोन्याच्या चेन, तसेच सोने व हिऱ्यांच्या बांगड्यांच्या खरेदीवर आकर्षक सवलती मिळवण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे.

या उपक्रमाची माहिती देताना पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ



गाडगीळ यांनी भारतीय संस्कृतीतील दागिन्यांच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, भारतीय विवाहसंस्कृतीत चेन आणि बांगड्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे केवळ दागिने नसून ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाणारा वारसा आणि विश्वासाचे प्रतीक आहेत. या महोत्सवाच्या माध्यमातून ग्राहकांनी या मौल्यवान दागिन्यांमध्ये गुंतवणूक करावी आणि या योजनांचा लाभ घ्यावा, अशी आमची इच्छा आहे. मूल्य, वैविध्य आणि उत्कृष्ट कारागिरी यांचा त्रिवेणी संगम साधण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

# एका एकरातील गहू रातोरात केला फस्त रानडुकरांचा हरभरा पाठोपाठ आता गहू, मक्यावर डल्ला

**तेल्हारा** : हरभरा पिकाची नासाडी केल्यानंतर आता रानडुकराचा गव्हावरही डल्ला मारणे सुरु असल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. कोटा शेतीशिवारातील भास्करराव चरपे यांच्या शेत शिवार नं ४० / १ मधील एकर भर गहू रातोरात फस्त केल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. तालुक्यात सध्या गहू पेरणीची धामधूम सुरू आहे. गहू पिकाला तरी रानडुकरांचा त्रास होणार नाही.असे शेतकऱ्यांना वाटत होते. परंतु या पिकाची रानडुकरांनी नासाडी सुरू केली आहे. हरभरा पिकाला रानडुकरांचा मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागला. तेल्हारा परिसरात रानडुक्कराचा मोठा वावर आहे. वन विभागाचे याकडे अजिबात लक्ष नाही. शेतकऱ्यांना यांचा मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. गुरांच्या चायासाठी शेतात शेतकरी मक्का लागवड करतात पण रानडुकरे तो रातोरात फस्त करीत आहेत.गहू पीक रानडुकराच्या तावडीतून वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना आता गहू पिकाची रखवाली करावी लागत आहे. रात्री अपरात्री शेतकऱ्यांना शेतात जावे लागत आहे.

## सायबर पोलीस स्टेशन अंतर्गत आर्थिक फसवणुक प्रकरणी आरोपीला दिल्ली येथुन अटक

▪अकोला,दि.९ (प्रतिनिधी)▪

दिनांक ३०/१२/२०२५ रोजी फिर्यादी, रा. अकोला यांनी पोलीस स्टेशन सायबर येथे तक्रार दिली की, त्यांना जहीद गणी मिर्चा या नावाच्या व्यक्तीशी फोनव्दारे ओळख झाली. त्यांनी फिर्यादीला त्यांच्या अँन्टीक मेटल सेल बिझनेस बद्दल सांगितले. व तुम्ही त्या बिझनेस मध्ये गुंतवणूक केली की एक कोटी रूपये नफा मिळवून देईल असे आश्वासन दिले.

त्यानंतर फिर्यादी यांनी जहीद गणी मिर्चा या व्यक्तीवर विश्वास ठेवून त्याचे सांगण्याप्रमाणे एकूण ९०,२४,८७० /- रूपये त्यांना पाठविले. त्यानंतर फिर्यादी यांनी झालेल्या नफ्याबाबत जहीद गणी मिर्चा या व्यक्तीस विचारणा केली असता फिर्यादीस उडवाउडवीचे उत्तरे दिली व आणखी गुंतवणूक करण्यास सांगितले. तेव्हा फिर्यादीस आपली फसवणूक झाल्याचे समजले वरून त्यांनी पो. स्टे. सायबर येथे अप क्र. १४/२०२५ कलम



३१८ (४) बी. एन. एस. सहकलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तसेच डिजिटल खुणा आणि तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीचा माग काढण्यात आला. दिनांक ०६/०१/२०२६ रोजी मा. पोलीस अधीक्षक साहेबाच्या आदेशाने आर्थिक गुन्हे शाखा येथुन सपोनि. जितेश कानपुरे, पोहवा. शेख हसन स्थानिक गुन्हे शाखा, पोहवा प्रशांत केदारे व पोअम. तेजस देशमुख पोस्टे सायबर हे आरोपी अटक करणेकामी दिल्ली येथे रवाना झाले.

आरोपीचा शोध घेतला असता आरोपी नामे जहीद गणी मिर्चा, वय ३६ वर्ष, रा. बारामुला जम्मू कश्मीर यांना दिनांक ०७/०१/२०२६ रोजी स्थानिक पोलीस यांच्या मदतीने दिल्ली येथुन ताब्यात घेण्यात आले असुन दिनांक ०८/०१/२०२६ रोजी कोर्ट क्र. ०१ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अकोला येथे हजर केले असता मा. न्यायालयाने दिनांक १९/०१/२०२६ पर्यंत पोलीस कस्टडी दिली आहे.सदरची कारवाई मा. श्री. अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक सो. अकोला यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. अनिल जुमळे, सपोनी जितेश कानपुरे आर्थिक गुन्हे शाखा व पोहवा. प्रशांत केदारे, पोहवा. शेख हसन व तेजस देशमुख पोस्टे सायबरचे यांनी सदरची कार्यवाही केली आहे.

## मुख्य निवडणूक निरीक्षक यांनी घेतला मतदान कार्यवाहीचा आढावा

▪अकोला,दि.९ (प्रतिनिधी)▪

अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने आज दि. ९ जानेवारी २०२६ रोजी मुख्य निवडणूक निरीक्षक मा.श्री अर्पित चौहान यांनी मनपा आयुक्त यांच्या दालनात आजपर्यंत झालेल्या नियोजनाबाबत तसेच तयारी बाबत आढावा सभा घेतली. यावेळी मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.सुनिल लहाने यांच्याव्दारे मुख्य निवडणूक निरीक्षक मा.श्री अर्पित चौहान आणि सहा.निवडणूक अधिकारी श्री ब्रिजेश पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मनपा आयुक्त डॉ.लहाने यांनी पीपीटीच्या माध्यमातून अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने मनपा प्रशासनाव्दारा करण्यात आलेले नियोजन आणि संपुर्ण मतदान प्रक्रियेसाठी नियोजित आराखडानुसार



माहिती दिली.तसेच यावेळी मुख्य निवडणूक निरीक्षक मा.श्री अर्पित चौहान यांनी आचार संहिता पथक, मतदान सी.यू.युनिट आणि बी.यू.यंनिट बाबत, स्ट्राँग रूम/मतमोजणी केंद्र आणि लागणारा मनुष्यबळ, संवेदनशील मतदार केंद्र, निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मागणीनुसार बीयू युनीटचे १०० टक्के पुरवठा आदींबाबत माहिती घेतली. तसेच मतमोजणी प्रक्रिया ६ ठिकाणी होणार असून पत्रकारांना मतमोजणी संदर्भातील संपूर्ण माहिती एकत्रित एकाच ठिकाणावरून मिळावी याकरीता उपाययोजना करण्याकरिता मुख्य निवडणूक निरीक्षक यांनी निर्देश दिले. यावेळी मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, मुख्य निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी सतीष गावंडे मुख्याधिकारी तेल्हारा, तसेच सर्व निवडणूक निर्णय अधिकारी आदि उपस्थित होते.

## गावागावातील ६०% लाडक्या बहिणीची ekyc मध्ये तांत्रिक चूक

▪अकोला,दि.९ (प्रतिनिधी)▪

- नोव्हेंबर २५ च्या हप्त्यापासून ६०% लाडक्या वंचित
- जिल्हा महिला बाल कल्याण कार्यालयात वंचित महिलांची गर्दी

महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभा निवडणूकीपूर्वी महाराष्ट्रातील लाडक्या बहिणीना १५००/- रुपये महिना ही लोकप्रिय योजना सुरु केली होती.

परंतु यात काही अपात्र महिलांचा समावेश झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यावर शासनाने सेतू केंद्रात सर्व लाडक्या बहिणींना ekyc करण्याचे सांगितले मात्र सेतू केंद्रात किंवा स्वतः च्या मोबाईल वर शझूल करताना त्यातील पुरेशी तांत्रिक माहिती नसल्याने चुकीची माहिती भरल्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील पात्र असलेल्या ६०% महिला नोव्हेंबर २०२५ मध्ये मिळणाऱ्या १५००/- रुपये मासिक हप्त्याला मुकल्या आहेत आणि ज्यांना नोव्हेंबर २०२५ हप्ता मिळाला नाही त्या लाडक्या बहिणी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन चौकशी करत असून त्यांचे आधारकार्ड चेक केल्यावर महिला बाल विकास कार्यालयातील संगणक परिचालक ekyc करतांना चुकीची माहिती अपलोड केल्याचे कारण सांगत आहेत मात्र माहिती चुकल्याने लाडक्या बहीण या योजनेत अपात्र होणाऱ्या महिलांची संख्या गावागावात ६०% पर्यंत पोहचली असून ही आकडेवारी पाहता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महायुती सरकारसाठी धोक्याची घंटा ठरू शकते. शासनाने गावागावातील अपात्र ठरलेल्या लाडक्या बहिणीसाठी परत एकदा शासनाच्या प्रशिक्षित व्यक्ती मार्फत शझूल करून पात्र असलेल्या महिलांना लाडक्या बहीण योजनेचा लाभ देणं सुरु करावे अशी सर्वसामान्य शहर आणि ग्रामीण भागातील महिलांनी केली आहे

### सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान

## १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारीदरम्यान २१ जिल्ह्यांत राबविणार मोहीम

▪अकोला,दि.९ (प्रतिनिधी)▪

केंद्र शासनाच्या सिकलसेल मिशन कार्यक्रमांतर्गत २०४७ पर्यंत सिकलसेल आजाराचे उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या अनुषंगाने ० ते ४० वयोगटातील प्रत्येक नागरिकाची सिकलसेल तपासणी करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे. यासाठी राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये दिनांक १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान राबविण्यात येणार आहे.या अभियानात अकोला जिल्ह्यासह ठाणे, नाशिक, नंदुरबार, अमरावती, गोंदिया, गडचिरोली, पालघर, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, धुळे, जळगाव, बुलढाणा, नांदेड, वाशिम, छत्रपती संभाजीनगर, रायगड व हिंगोली या जिल्ह्यांचा समावेश आहे. अकोला जिल्ह्यात हे अभियान जिल्हाधिकारी वर्षा मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम व उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. सुशीलकुमार वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागांच्या समन्वयाने राबविण्यात येणार आहे. या मोहिमेचे नियोजन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी केले आहे.अभियानाच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी घरोघरी जनजागृती करण्यात येणार असून आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, समुदाय आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी नागरिकांपर्यंत थेट पोहोचणार आहेत. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी व शासकीय यंत्रणा यांच्या सहकार्याने ही मोहीम प्रभावीपणे राबविली जाणार आहे.याच अनुषंगाने दि. ८ जानेवारी २०२६ रोजी ग्रामीण आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालय, पातूर येथे विद्यार्थ्यांना व प्राचार्यांना सिकलसेल मोहिमेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी बाळासाहेब घुगे, विस्तार अधिकारी पांडुरंग तेलगोटे, आरोग्य सेवक दराडे उपस्थित होते. महाविद्यालय प्रशासनाने सहकार्य केले.

## धनगर लाभार्थ्यांच्या घरकुलांचा प्रस्ताव शासनाकडे सादर

**अकोला :** राबवण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना आणि धनगर समाजासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेच्या अंमलबजावणीला वेग आला आहे. अकोला जिल्ह्यातील पात्र १,४७५ अर्जदारांच्या घरकुलांचा प्रस्ताव जिल्हा इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाकडून राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे.

यापूर्वी प्रशासनाच्या काही तांत्रिक अडचणींमुळे समाजातील अनेक गरजू नागरिक या योजनेपासून वंचित राहिले होते. याबाबत भाजप ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष मनीष गावंडे यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

## HIV एड्स व आरोग्य विषयी पथनाट्याव्दारे गावात जनजागृती कार्यक्रम संपन्न

### स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठाण,पातूर कडून सादरीकरण

▪अकोला,दि.९ (प्रतिनिधी)▪

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था,मुंबई अंतर्गत लिंक वर्कर स्कीम जिल्हा अकोला व भाग्योदय आरोग्य व बहुउद्देशीय शिक्षण संस्था,अकोला व स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठाण,पातुर यांच्या वतीने व जिल्हा साधन व्यक्ती सुरजसिंग जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला जिल्हातील विवरा, चरणगाव, बाभूळगाव, आलेगांव, वाडेगांव या ग्रामपंचायती मध्ये एच.आय.व्ही एड्स व टी.बी, गुप्तरोग तसेच आरोग्य विषयी माहिती व उपाययोजनेची परिपुर्ण माहिती लोककला व पथनाट्याव्दारे जनजागृती कार्यक्रमातून देण्यात आली.

यावेळी युवाश्री विशाल राखोंडे व्दारा लिखित लोककला व पथनाट्य जनजागृती कार्यक्रम स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठाण, पातुरचे अध्यक्ष तथा लोककवी सागर राखोंडे व त्यांचे सहकारी शाहीर प्रकाश इंगोले, सुखदेव उपर्वट, कैलास सिरसाट, गजानन आवटे, बाळू देवकर, यांनी पथनाट्य व विविध लोकगीताच्या माध्यमातून



एच.आय.व्ही एड्स व क्षयरोग, टी.बी तसेच गुप्तरोगा बाबत परिपूर्ण माहिती दिली त्यामध्ये नियमित रक्ताची तपासणी करणे, विविध आजाराचे लक्षणे, त्यावर उपाय योजना, महिलांना आरोग्य विषयी मार्गदर्शन करून नियमित रक्त तपासणी बाबत व लिंक वर्कर स्कीमबाबत व आरोग्य विषयक योजनांची माहिती लोककला व पथनाट्याव्दारे देण्यात आली.

## गजानन महाराजांच्या पालखीचे स्वागत

▪मुर्तिजापुर,दि.९ (प्रतिनिधी)▪

गण गण गणांत बोतेरच्या भक्तीमय जयघोषात आणि टाळ-मृदंगाच्या गजरात, श्री संत गजानन महाराज यांच्या दर्शनासाठी शेगावकडे जाणाऱ्या पायदळ वारीचे शहरात उत्साहात स्वागत करण्यात आले. मंगळवार रोजी श्री गजानन महाराज सेवा प्रतिष्ठान, मूर्तिजापूर तर्फे आयोजित या पालखी सोहळ्याने शहरात चैतन्याचे वातावरण निर्माण केले होते. प्रतीक नगर येथील 'श्री संत गजानन महाराज मंदिर' येथून ही पालखी शेगावच्या दिशेने मार्गस्थ झाली. यावेळी आमदार हरीश पिंपळे यांनी पालखीचे मनोभावे पूजन व आरती केली. या प्रसंगामुळे संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता. या सोहळ्यात आमदार हरीश पिंपळे यांच्यासह नगराध्यक्ष हर्षल साबळे, नूतनताई पिंपळे आणि भाजपचे नगरसेवक पंकज पाटीलकांबे, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आमदार पिंपळे यांनी यावेळी सर्व वारकऱ्यांशी संवाद साधून त्यांचा सत्कार केला. शेगावच्या दिशेने निघालेल्या या भाविकांचा प्रवास सुखकर व्हावा आणि सर्वांना उत्तम आरोग्य लाभावे,अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.

## ग्राहकांच्या हक्कांच्या संरक्षणाचे बदलते स्वरुप

### शाहीर खंडूजी शिरसाट व संच यांनी सादर केला जनजागृतीपर कार्यक्रम



▪अकोला,दि.९ (प्रतिनिधी)▪

''ग्राहकांच्या हक्कांच्या संरक्षणाचे बदलते स्वरुप या विषयावर जनजागृती लोकनाट्य मंडळाद्वारे जनजागृतीपर कार्यक्रम सादर करण्यात आला. या मध्ये शाहीर खंडूजी शिरसाट व संच उत्कृष्ट असा जनजागृतीपर कार्यक्रम सादर करुन सर्वांनी मने जिंकुन घेवून ग्राहकांनी आपल्या असलेल्या हक्कांचे संरक्षण कश्या प्रकारे करावे या विषयावर सादरीकरण केले. स्थानिक नियोजन विभाग अकोला येथे राष्ट्रीय ग्राहक दिनाचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी वर्षा मीना होत्या तर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार डिजिटल व्याप्ताद्वारे ग्राहक तक्रारीचे कार्यक्रम आणि वेगवान निवारण या विषयावर यावेळी मार्गदर्शन आणि जनजागृती लोकनाट्य मंडळ अकोलाचे वतीने शाहीर खंडूजी शिरसाट व संच यांनी शासनाच्या आदेशान्वये कार्यक्रम ग्राहक हक्क दिवस सादर करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला जिल्हा ग्राहक मंचाचे अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, जिल्हा पुरवठा अधिकारी रविंद्र यन्नेवार, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना निमजे तहसील कार्यालय अकोला येथील अधिकारी, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने ग्राहक यावेळी उपस्थित होते.

## हुंड्यासाठी विवाहितेचा छळ; घरात कहर, पतीवर गुन्हा

▪मुर्तिजापुर,दि.९ (प्रतिनिधी)▪

मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात विवाहितेच्या तक्रारीवरून पतीविरुद्ध गुन्हा; पोलीस ठाणेदार श्रीधर गुठ्ठे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात विवाहितेच्या तक्रारीवरून पतीविरुद्ध हुंडा छळ, घरात शिवीगाळ आणि मारहाणीचा



गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादीने तक्रारीत नमूद केले आहे की, हुंडा इच्छेप्रमाणे न दिल्याचे कारण देत आरोपीने स्वयंपाक व घरकाम व्यवस्थित न केल्याबद्दल सतत अपमान, धमक्या देणे, आर्थिक, शारीरिक व मानसिक छळ केला आणि घराबाहेर काढल्याचा आरोप केला.सदर तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर रडके करत असून पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस ठाणेदार श्रीधर गुठ्ठे यांच्या देखरेखीखाली अप. नं. ०९/२०२६ अन्वये बीएनएस २०२३ चे कलम ८५, ३५१(२), ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल केला गेला आहे. फिर्यादीच्या जबानी तक्रारीवर भरोसा सेलने पत्र क्रमांक १०१३/२०२५ दि. २३/१२/२०२५ नोंदविले असून, पुढील तपास आणि आरोपीच्या अटकसाठी पोलीस मोठ्या पद्धतीने कारवाई करीत आहेत.

## पत्रकारांनी भेदभावांना टाळून सद्भावनांनी संघटीत व्हावे : संजय एम.देशमुख





▪अकोला,दि.९ (प्रतिनिधी)▪

- स्लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाकडून जल्लोषात पत्रकार दिन साजरा.सर्वांच्या एकत्रीकरणाचा अभिनव प्रयत्न..!
- ४० पत्रकारांचा राज्यस्तरीय पुरस्कारांनी व ईतरांचेही सन्मान

बदलत्या काळात कोसळणाऱ्या संकटांचा मुकाबला करण्यासाठी अवास्तव अहंभावाने निर्माण झालेल्या सर्व प्रकारच्या भेदभावांनी तिलांजली देऊन लहान मोठी वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक आणि डिजीटल मिडीयातील सर्व पत्रकारांनी संघटीत झालं पाहिजे. संभाव्य गंभीर धोक्यांना ओळखून स्वत:चा स्वाभिमान आणि अस्तित्वाचे रक्षण करण्यासाठी संघटीत होऊन सद्रभावनांनी एकत्र येणे ही वर्तमानाची खरी गरज आहे.त्यासाठी लोकस्वातंत्र्य चळवळीला महासंघ असे नाव देण्यात आलेले आहे.म्हणून खऱ्या अर्थाने संघटीत शक्तीचे ध्येय गाठण्यासाठी राज्य आणि देशपातळीवरील सर्व पत्रकारांनी भेदापलिकडे विचार करून या समाजाभिमुख राष्ट्रीय प्रवाहात सहभागी व्हावे.असे वास्तव प्रतिपादन लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ या अ.भा.समाजाभिमुख राष्ट्रीय संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम. देशमुख यांनी केले.लोकस्वातंत्र्यकडून 'समाजाला अपेक्षित असणारा पत्रकार कसा असावा' या विषयावर परिसंवाद व ४० पत्रकारांना राज्यस्तरीय पुरस्कारांनी व ईतरांना शाल व पुष्पगुच्छ देऊन संटनेकडून स्नेहपूर्वक सन्मानित करण्यात आले.लहान मोठी वृत्तपत्रे , इलेक्ट्रॉनिक्स आणि डीजीटल मिडीयातील पत्रकारांच्या भरगच्च उपस्थितीत हा पत्रकार दिन साजरा करण्यात आला. उपस्थित मान्यवर व पदाधिकाऱ्यांनी पत्रकार कसा असावा आणि समाजासाठी त्याचे काय योगदान असावे या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. संघटनेच्या समतावादी धोरणानुसार राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांचा सन्मान म्हणून घेतलेल्या निर्णयानुसार लोकस्वातंत्र्यचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार प्रदिप खाडे या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.तर अकोला जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार प्रमुख अतिथी म्हणून तर ज्येष्ठ पत्रकार स्तंभलेखक प्रा.मोहन खडसे,सिध्दहस्त पत्रकार महेन्द्र कवीश्वर,अ'ड.अनंतराव खेळकर,दिनेश शुक्ल,निशाली पंचगाम,माणिकराव कांबळे,खामगावचे ज्येष्ठ पत्रकार व लोकस्वातंत्र्यचे महाराष्ट्र संघटन प्रमुख जगदिश अग्रवाल,विदर्भ संघटक सागर मोदी यांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्वप्रथम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज , कर्मयोगी संत गाडगेबाबा व महपुरूषांना अभिवादन आणि शहिद जवानांसह विविध बळींना श्रध्दांजली वाहण्यात आली.लोकस्वातंत्र्य 'पत्रकार भूषण सेवागौरव' व 'लोकस्वातंत्र्य प्रभावी पत्रकारिता सेवा गौरव' या राज्यस्तरीय पुरस्कारांनी ४० पत्रकारांना व ईतर पत्रकार बाधवांना शाल व पुष्पगुच्छांनी पत्रकार दिनी सन्मानित करण्यात आले.लोकस्वातंत्र्य विदर्भ अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. किरण वाघमारे व विदर्भ संघटन प्रमुख म्हणून राजेश खारोडे यांना पुरस्कारांसोबतच नियुक्तीपत्र व आय कार्ड प्रदान करण्यात आले. सौ.जया भारती यांच्या संचलनाखाली झालेल्या या कार्यक्रमात जिल्हा माहिती अधिकारी व ज्येष्ठ पत्रकारांनी आपले विचार व्यक्त केले व महाराष्ट्रातील नामवंत कवी अनंत खेडकर यांनी आपल्या कवितेतून कार्यक्रमात रंगत आणली व हास्यांचा कडेलोट केला या कार्यक्रमाला पत्रकार संघाचे बहूसंख्य पत्रकार उपस्थित होते.आभारप्रदर्शन सौ.दिपाली बाहेकर यांनी केले.

## प्रा.राजदत्त मानकर यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त भागवत सप्ताह

**अकोला :** मराठा पाटील मराठा समाजाचे संस्थापक आणि बाळापुर तालुक्याचे अध्यक्ष व वाडेगाव येथील रहिवासी स्वर्गीय प्रा. राजदत्त गुरुदत्त मानकर यांच्या प्रथम पुण्यतिथी



निमित्त श्रीमदब भागवत कथा व हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. १६ जानेवारी ते २३ जानेवारी दरम्यान या सप्ताहाचे आयोजन वाडेगाव सकाळी १० ते १ वाजताचे दरम्यान स्थानिक जागृत चौक येथे होणार आहे. ह. भ. प . राजेंद्र महाराज वक्ते यांच्या अमृतवाणीतून होणाऱ्या श्रीमदब भागवत कथेचा लाभ तसेच १७ जानेवारीला सुरेखाताई माळी यांचे कीर्तनाचा कार्यक्रम असून अकोला येथील राजराजेश्वर मंडळ तर्फे २०जानेवारी रोजी सुंदरकांड कीर्तनचा कार्यक्रम आयोजित असून रोज सकाळी ५ते सहा काकडा आरती व सकाळी १ते ५ भागवत कथा व संध्याकाळी ६ते ७ हरिपाठ होणार आहे तरी वाडेगाववासी यांनी घ्यावा असे आवाहन ॲड.मोहन मानकर,योगेश मानकर ,स्वामी मानकर व समस्त मानकर परिवार यांनी केले आहे.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak. Local Editor Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# बालविवाह : कायदे, आकडे आणि सामाजिक वास्तव यातील दरी

संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांअंतर्गत भारताने २०३० पर्यंत बालविवाह पूर्णपणे संपवण्याचे महत्त्वाकांक्षी वचन दिले आहे. या दिशेने केंद्र सरकारने अलीकडेच बालविवाहमुक्त भारत मोहिमेचा पहिला वर्धापन दिन साजरा केला आणि १०० दिवसांची जागरूकता मोहीम सुरू केली. या प्रयत्नांमुळे निश्चितच लक्षणीय प्रगती झाली आहे, परंतु १.४६ अब्ज लोकसंख्येच्या या विशाल आणि विविधतेने नटलेल्या देशात अजूनही बराच पल्ला गाठणे बाकी आहे. बालविवाहाचे प्रमाण कमी होत असले तरी, विविध राज्ये आणि सामाजिक-आर्थिक स्तरांमधील असमान प्रगती ही चिंतेची बाब आहे.

-----------



भाग १

विकास परसराम मेश्राम
मु+पो, झरपडा,
ता. अर्जुनी/मोर, जि. गोंदिया.
7875592800
vikasmeshram04@gmail.com

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार, २००५-०६ मध्ये बालविवाहाचे प्रमाण ४७.४% होते, जे २०१९-२१ मध्ये २३.३% पर्यंत घसरले आहे. ही घट निश्चितच प्रोत्साहनदायक आहे आणि सरकारी धोरणे, जागरूकता मोहिमा आणि सामाजिक बदलांचे प्रतिबिंब आहे. सन २०१५-१६ च्या सर्वेक्षणात हे प्रमाण २६.८% होते, ज्यावरून पाहता शेवटच्या काही वर्षांत प्रगतीचा वेग थोडासा मंदावला आहे. तथापि, या आकडेवारीमागे लपलेली वास्तविकता अधिक गुंतागुंतीची आहे. विविध राज्यांमधील तफावत लक्षणीय आहे आणि काही भागांत ही समस्या अजूनही गंभीर स्वरूपात विद्यमान आहे.

युनिसेफच्या २०२१ च्या अहवालानुसार, भारतात जगातील बालविवाहित मुलींची सर्वाधिक संख्या आहे, सुमारे १.५ कोटी मुली १८ वर्षांपूर्वी विवाहबद्ध होतात. जागतिक स्तरावर प्रत्येक वर्षी बालविवाहात अडकणाऱ्या १.२ कोटी मुलींपैकी भारताचा वाटा महत्त्वपूर्ण आहे. हे आकडे भारतासमोरील आव्हानाचे प्रमाण स्पष्ट करतात. सध्याच्या प्रगतीचा वेग पाहता, २०३० चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्नांची तीव्रता दुप्पट करणे आवश्यक आहे.

पश्चिम बंगाल, बिहार आणि त्रिपुरा या राज्यांमध्ये १८ ते २९ वयोगटातील महिलांमध्ये बालविवाहाचे प्रमाण सर्वाधिक आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ च्या आकडेवारीनुसार, पश्चिम बंगालमध्ये हे प्रमाण ४१.६% आहे, जे राष्ट्रीय सरासरीच्या जवळपास दुप्पट आहे. बिहारमध्ये ४०.८% आणि त्रिपुरामध्ये ४०.१% मुलींचे लग्न १८ वर्षांपूर्वी झाले आहे. झारखंडमध्ये ३८%, आंध्र प्रदेशात ३३.४%, आसाममध्ये ३१.८%, तेलंगणामध्ये ३१.४%, मध्य प्रदेशात २९.३% आणि राजस्थानमध्ये २७.३% मुलींचे बालविवाह झाले आहेत.

याउलट, काही राज्यांनी उल्लेखनीय प्रगती केली आहे. हिमाचल प्रदेशात बालविवाहाचे प्रमाण केवळ ६.१%, गोव्यात ९.२%, दिल्लीत ९.२%, पंजाबमध्ये १०.३% आणि केरळमध्ये १०.६% आहे. या राज्यांनी शिक्षणावर भर देऊन, आर्थिक विकास साधून आणि सामाजिक जागृती निर्माण करून हे यश मिळवले आहे. या राज्यांचे धोरण आणि अंमलबजावणी उच्च बालविवाह प्रमाण असलेल्या राज्यांसाठी मार्गदर्शक ठरू शकते.

संयुक्त राष्ट्रांच्या लोकसंख्या निधीच्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या सखोल विश्लेषणातून बालविवाह, गरिबी आणि शिक्षण यांच्यातील थेट आणि अटूट संबंध स्पष्टपणे उघड झाला आहे. या अभ्यासाने दर्शविले आहे की घरगुती संपत्ती निदेशांकाच्या सर्वात कमी पाचव्या स्थानावरील ४० टक्के मुलींचे लग्न प्रौढत्वापूर्वी झाले होते, तर सर्वोच्च पाचव्या स्थानावरील केवळ आठ टक्के मुलींचे लग्न अशा लहान वयात झाले. ही तफावत आर्थिक परिस्थितीचा बालविवाहावरील थेट प्रभाव स्पष्ट करते.

विश्व बँकेच्या आकडेवारीनुसार, बालविवाहामुळे भारताला दरवर्षी सुमारे १.७ लाख कोटी रुपयांचा आर्थिक नुकसान होतो. या नुकसानात मुलींच्या शिक्षणातील व्यत्यय, आरोग्य खर्च, उत्पादकता कमी होणे आणि पिढ्यानपिढ्या चालू राहणारे दारिद्र्याचे चक्र यांचा समावेश आहे. जर भारत बालविवाह पूर्णपणे समाप्त करू शकला तर सन २०३० पर्यंत सुमारे १.८ कोटी मुलींना याच्या दुष्परिणामांपासून वाचवता येईल आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला प्रचंड गती मिळेल.

गरिबीमुळे कुटुंबे मुलींना आर्थिक ओझे मानतात आणि लवकर विवाह हा त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग समजतात. ग्रामीण भागात जेथे शेती आणि मजुरीवर उपजीविका अवलंबून आहे, तेथे मुलींना शिक्षणात गुंतवणूक करण्याऐवजी त्यांचे लग्न लावून आर्थिक जबाबदारीतून मुक्त होण्याचा प्रयत्न केला जातो. हुंडा प्रथा अजूनही अनेक समुदायांमध्ये प्रचलित असून, लहान वयात विवाह केल्यास हुंडा कमी द्यावा लागतो या समजुतीमुळे देखील बालविवाहाला चालना मिळते.

शिक्षणाचा प्रभाव आणखी स्पष्ट आहे. शिक्षण नसलेल्या ४८ टक्के मुलींचे लग्न १८ वर्षांच्या आधी झाले होते, तर उच्च शिक्षण घेतलेल्या मुलींमध्ये ही संख्या केवळ चार टक्के होती. प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या मुलींमध्ये हे प्रमाण ३५%, माध्यमिक शिक्षण घेतलेल्यांमध्ये १८% आणि उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्यांमध्ये ८% आहे. हे आकडे स्पष्टपणे दर्शवतात की शिक्षणाची पातळी जितकी वाढते तितके बालविवाहाचे प्रमाण कमी होते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने मुलींच्या शिक्षणावर विशेष भर दिला आहे, परंतु प्रत्यक्षात अनेक आव्हाने आहेत. युनिफाइड जिल्हा माहिती शिक्षण प्रणाली (यू-डीआयएसई) च्या २०२०-२१ च्या अहवालानुसार, प्राथमिक स्तरावर मुलींची नोंदणी दर ९४.३२% आहे, परंतु माध्यमिक स्तरावर हा दर घसरून ६१.८% होतो आणि उच्च माध्यमिक स्तरावर तर केवळ ३८.५% मुली शिक्षण घेत आहेत. ग्रामीण भागात स्थिती आणखी गंभीर आहे, जिथे उच्च माध्यमिक स्तरावर मुलींची नोंदणी दर केवळ २५% आहे.

शाळा सोडण्याचे मुख्य कारण म्हणून सुमारे ३०% मुली आर्थिक कारणे सांगतात, २५% मुली घरातील कामांमध्ये गुंतल्यामुळे, १५% मुली शाळा दूर असल्यामुळे आणि १२% मुली विवाहामुळे शिक्षण सोडतात. महाराष्ट्रात राबविण्यात आलेल्या माझी कन्या भाग्यश्री योजनेनुसार, मुलीच्या जन्मानंतर आणि शालेय शिक्षणाच्या विविध टप्प्यांवर आर्थिक सहाय्य दिले जाते, ज्यामुळे शाळा सोडण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे.

शिक्षित मुली स्वतःच्या हक्कांबद्दल जागरूक असतात, त्यांच्या निर्णयक्षमतेत वाढ होते आणि त्यांना आर्थिक स्वातंत्र्याची संधी मिळते. तथापि, अनेक भागांत मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवणारे विविध अडथळे आहेत.

शाळांमध्ये स्वच्छ शौचालयांचा अभाव हे मुलींच्या शिक्षणात मोठा अडथळा आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणानुसार, ज्या शाळांमध्ये स्वच्छ आणि कार्यरत शौचालये आहेत त्या शाळांमध्ये मुलींची उपस्थिती ११% जास्त आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत शाळांमध्ये शौचालय बांधण्याचा उपक्रम राबविला आहे, परंतु त्यांची देखभाल आणि स्वच्छता ही आव्हानात्मक आहे.

सुरक्षित वातावरणाचा अभाव देखील मोठा मुद्दा आहे. राष्ट्रीय अपराध नोंद ब्यूरोच्या आकडेवारीनुसार, २०२१ मध्ये मुलींविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये १४% वाढ झाली. शाळेपर्यंत जाताना आणि येताना मुलींच्या सुरक्षिततेची चिंता अनेक पालक व्यक्त करतात.

(क्रमशः)

■ ■ ■

## गोड गळ्याचे गायक येसुदास

श्याम ठाणेदार
दौंड. जि. पुणे.
९९२२५४६२९५

आज १० जानेवारी हिंदी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम गायक आणि संगीतकार येसुदास यांची ८६ वाढदिवस. हिंदी चित्रपट सृष्टीत ज्या गायकांनी आपल्या मधुर आवाजाने ठसा उमटवला त्यात येसुदास हे एक महत्वाचे नाव.

१० जानेवारी १९४० रोजी एका मल्याळम ख्रिश्चन कुटुंबात जन्मलेल्या येसुदास यांचे वडील मल्याळम भाषेतील शास्त्रीय संगीतकार होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी संगीतकलेचे प्राथमिक धडे गिरवले. वयाच्या सातव्या वर्षी कोची येथील स्थानिक स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी सुवर्णपदक जिंकले. कन्नड, मल्याळम, तेलगू आणि तामिळ या दक्षिण भारतातील सर्व भाषेत त्यांनी गाणी गायली तिथे त्यांनी गायलेली सर्वच गाणी हिट झाली. त्यांच्या आवाजाची परदेशातील रसिकांना देखील भुरळ पडली. १९६५ साली रशियन सरकारने त्यांना गाण्यासाठी खास आमंत्रण दिले होते.

गोड, मखमली आवाज ही येसुदास यांची ओळख बनली. संगीतकार सलील चौधरी यांनी त्यांना दिग्दर्शक बासू चॅटर्जी यांच्या छोटीशी बात या चित्रपटात साठी एक गाणे गायला लावले. त्यांच्या आवाजाने बासू चॅटर्जी हे ही प्रभावित झाले त्यांनी त्यांना त्यांच्याच चित्रपटात गाण्याची ऑफर दिली.

१९७० सालापासून त्यांनी हिंदी गाणी गायला सुरवात केली. जानेमन जानेमन तेरे दो नयन.... या गाण्यानंतर शांत सज्जन दिसणारा अमोल पालेकर यांच्यासाठी येसुदास यांचाच आवाज सूट होतो असा असे गणित बॉलिवूडने बांधले. येसुदास यांनी अमिताभ बच्चन आणि जितेंद्र यांच्यासाठीही गाणी गायली. त्यांनी रवींद्र जैन, बप्पी लाहिरी, खय्याम, राजकमल, सलील चौधरी या संगीतकारांसमवेत गाणी गायली. सध्याच्या पद्धतीची गाणी त्यांना आवडत नाहीत म्हणून त्यांनी बऱ्याच वर्षांपासून गाणे गायचे थांबवले आहे.

भारत सरकारने त्यांना २००२ साली पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार दिला आहे तर केरळ सरकारने त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील सर्वोत्तम स्वाती पुरस्कारम या पुरस्काराने गौरविले आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत.

येसुदास यांनी गायलेली गोरी तेरा गाव बडा प्यारा, सुरमई अखियों मे, दिल के तुकडे तुकडे करके, जानेमन जानेमन तेरे दो नयन, चांद जैसे मुखडे पे ही गाणी आजही लोकप्रिय आहेत.

येसुदास यांचे चाहते केवळ भारतातच आहेत असे नव्हे जगभर त्यांचे चाहते आहेत. गोड आणि मखमली आवाजाचे गायक येसुदास यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

■ ■ ■

# विश्वाच्या रहस्यांचे अंतर्मन

विजयकुमार राऊत
नागपूर.

विपश्यना, ध्यान आणि क्वांटम फिजिक्स हे पाहायला वेगवेगळ्या क्षेत्रातले विषय वाटतात, पण अधिक खोलात गेल्यावर त्यांच्यात आश्चर्यकारक साम्य दिसते.

विपश्यना ही बुद्धांनी दिलेली ध्यानपद्धत असून ती माणसाला स्वतःच्या शरीर-मनातील संवेदना, भावना आणि विचार यांचे शांतपणे निरीक्षण करायला शिकवते. या निरीक्षणातून साधकाला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की शरीरातील वेदना, सुख-दुःख, विचार काहीही कायम नसते. सर्व काही क्षणाक्षणाला बदलत असते. बुद्धांनी यालाच अनित्यता असे म्हटले आहे. क्वांटम फिजिक्समध्येही हाच बदलाचा नियम दिसतो.

अणू-परमाणूंच्या पातळीवर पाहिले तर कण ठोस स्वरूपाचे नसून ऊर्जा आणि संभाव्यतेच्या रूपात अस्तित्वात असतात. निरीक्षण होईपर्यंत त्यांची निश्चित अवस्था ठरत नाही, म्हणजेच पाहणारा आणि पाहिले जाणारे यांचा परस्पर संबंध निर्माण होतो. हेच तत्त्व विपश्यनेतही दिसते, कारण साधक जसा-जसा संवेदनांचे निरीक्षण करतो, तसा-तसा त्याचा त्या संवेदनांशी असलेला आसक्तपणा कमी होतो. विपश्यना ह्यमीह्य आणि माझे या भावनेचा भंग करते, तर क्वांटम फिजिक्स स्वतंत्र आणि स्थायी कणाची कल्पना मोडून काढते.

दोन्ही ठिकाणी वास्तव स्थिर नसून प्रवाही आहे, हे स्पष्ट होते. विज्ञान प्रयोगांच्या माध्यमातून हे सत्य मांडते, तर विपश्यना प्रत्यक्ष अनुभवाद्वारे. त्यामुळे विपश्यना आणि क्वांटम फिजिक्स हे दोन वेगळे मार्ग असले तरी ते माणसाला एकाच सत्याकडे नेतात. सर्व काही बदलते, काहीही कायम नाही आणि जागरूक निरीक्षणातूनच खरी समज आणि मुक्ती मिळू शकते.

मानवी संस्कृतीच्या इतिहासात सत्याचा शोध दोन भिन्न मार्गांनी घेतला गेला आहे. एक मार्ग 'अंतर्मुख' होऊन स्वतःच्या आत डोकावण्याचा आहे, ज्याला आपण अध्यात्म किंवा ध्यान म्हणतो; आणि दुसरा मार्ग 'बहिर्मुख' होऊन निसर्गाच्या नियमांचा अभ्यास करण्याचा आहे, ज्याला आपण विज्ञान म्हणतो.

प्राचीन काळी गौतम बुद्धांनी 'विपासना' या ध्यानपद्धतीद्वारे मानवी अस्तित्वाचे जे सत्य शोधले होते, तेच सत्य आज आधुनिक विज्ञानाची सर्वात प्रगत शाखा 'क्वांटम फिजिक्स' गणिताच्या आणि प्रयोगांच्या आधारे मांडत आहे. हे दोन्ही मार्ग एकाच बिंदूवर कसे मिळतात, हे समजून घेणे अत्यंत विस्मयकारक आहे.

### अनित्यता: विश्वाचे नृत्य

विपासना ध्यानाचा मूळ गाभा 'अनित्य' हा शब्द आहे. विपासना साधना करताना साधकाला स्वतःच्या शरीरावर अत्यंत सूक्ष्म संवेदनेचा अनुभव येतो. बुद्ध म्हणतात की, हे शरीर घन किंवा स्थिर नसून ते सतत बदलणाऱ्या 'कलापां'नी (अत्यंत सूक्ष्म कण) बनलेले आहे. हे कण एका सेकंदात कोट्यवधी वेळा निर्माण होतात आणि नष्ट होतात. त्यामुळे, ज्याला आपण 'स्थिर शरीर' समजतो, ते प्रत्यक्षात ऊर्जेचा एक प्रवाही प्रवाह आहे.

क्वांटम फिजिक्समध्ये यालाच 'क्वांटम फ्लक्चुएशन' म्हणतात. अणूच्या आत डोकावून पाहिले असता शास्त्रज्ञांना असे आढळले की, सब-ॲटॉमिक पार्टिकल्स हे स्थिर नसून ते सतत लहरींच्या स्वरूपात स्पंदने पावत असतात. प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ एफ्राईम स्टीफनसन यांच्या मते, विश्वात काहीही स्थिर नाही; सर्व काही केवळ ऊर्जेची कंपने आहेत. विपासनेचा साधक हेच सत्य लॅबोरेटरीमध्ये नव्हे, तर स्वतःच्या शरीराच्या प्रयोगशाळेत अनुभवतो.

### निरीक्षकाचा प्रभाव: जाणीव आणि वास्तव

क्वांटम फिजिक्समधील Double Slit Experiment हा विज्ञानातील एक क्रांतिकारी टप्पा आहे. या प्रयोगाने सिद्ध केले की, एखादा सूक्ष्म कण 'कण' (Particle) म्हणून वागणार की 'लहर' (Wave) म्हणून, हे त्या कणाकडे कोण पाहत आहे यावर अवलंबून असते. जोपर्यंत निरीक्षक त्याकडे पाहत नाही, तोपर्यंत तो लहर असतो; पण निरीक्षकाने पाहताच तो कणाचे रूप घेतो. याला 'ऑब्झर्व्हर इफेक्ट' म्हणतात.

विपासना नेमकी याच तत्त्वावर काम करते. विपासनेमध्ये आपण आपल्या मनातील विकार किंवा शरीरातील वेदनांकडे केवळ 'साक्षी' भावाने पाहायला शिकतो. जेव्हा आपण एखाद्या वेदनेकडे तटस्थपणे, प्रतिक्रिया न देता पाहतो, तेव्हा त्या वेदनेचे स्वरूप बदलू लागते. निरीक्षकाची ही सजगता या वास्तवावर परिणाम करते.

विपासना आपल्याला शिकवते की, आपण जगाकडे ज्या दृष्टिकोनातून पाहतो, तसेच आपले जग घडते. तुमची 'जाणीव' (Consciousness) हेच तुमचे वास्तव निर्माण करणारे मुख्य साधन आहे.

### शून्यता: पदार्थाचा आभास

बुद्धांनी 'शून्यता' किंवा 'अनात्म' हा सिद्धांत मांडला. याचा अर्थ असा की, कोणत्याही गोष्टीमध्ये स्थिर किंवा स्वतंत्र असे काहीही नाही. सर्व काही परस्परवलंबी आहे. जर तुम्ही अणूचे विभाजन करत गेलात, तर शेवटी तुम्हाला काहीही 'घन' सापडणार नाही, केवळ रिकामी जागा आणि ऊर्जा सापडेल.

आधुनिक विज्ञानाने हे मान्य केले आहे की, अणूचा ९९.९९% भाग हा केवळ पोकळी (Empty Space) असतो. जर अणूतील ही पोकळी काढून टाकली, तर संपूर्ण जगातील मानवजात एका साध्या साखरेच्या क्यूबमध्ये मावू शकेल. ज्याला आपण 'मॅटर' किंवा पदार्थ म्हणतो, तो केवळ एक आभास आहे. विपासना साधनेच्या 'भंग' या अवस्थेत साधकाला आपल्या शरीराचे असेच विघटन झाल्याचा अनुभव येतो. त्याला जाणवते की, हा देह म्हणजे केवळ पोकळी आणि लहरींचा खेळ आहे.

### एंटँगलमेंट : वैश्विक एकात्मता

क्वांटम फिजिक्समधील 'क्वांटम एंटँगलमेंट' हा सिद्धांत सांगतो की, विश्वातील दोन कण एकमेकांपासून कितीही दूर असले (अगदी करोडो प्रकाशवर्षे), तरी ते एकमेकांशी जोडलेले असतात. एका कणात झालेला बदल दुसऱ्या कणात तात्काळ प्रतिबिंबित होतो.

विपासनेमध्येही 'मेत्ता' किंवा करुणेची भावना व्यक्त केली जाते. जेव्हा एखादी व्यक्ती ध्यान करून स्वतःचे मन शुद्ध करते, तेव्हा तिच्या सकारात्मक लहरींचा प्रभाव केवळ तिच्यावरच नाही, तर आसपासच्या वातावरणावर आणि इतर व्यक्तींवरही होतो. आपण सर्वजण एकाच 'कॉस्मिक एनर्जी'चा भाग आहोत, हा विपासनेचा अनुभव क्वांटम एंटँगलमेंटशी मिळताजुळता आहे.

### कार्यकारणभाव: कर्म आणि कार्यकारण नियम

विज्ञान 'कॉज अँड इफेक्ट' या नियमावर चालते. बुद्ध याच नियमाला 'धम्म' किंवा 'निसगार्चा नियम' म्हणतात. विपासनेनुसार, आपण आपल्या मनात जे विचार पेरतो, त्याचे फळ आपल्याला भोगावे लागते.

क्वांटम लेव्हलवर देखील प्रत्येक क्रिया ही एका निश्चित नियमाने बांधलेली असते, जरी ती वरवर पाहता यादृच्छिक (Random) वाटत असली तरी. तात्पर्य, विपासना आणि क्वांटम फिजिक्स या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. फरक फक्त इतकाच आहे की, भौतिकशास्त्र 'बाहेरच्या' विश्वाचा अभ्यास करून सत्याचा शोध घेते, तर विपासना 'आतल्या' विश्वाचा अभ्यास करून मुक्तीचा मार्ग दाखवते.

आईन्स्टाईन यांनी म्हटले होते की, धर्म विज्ञानाशिवाय पांगळा आहे आणि विज्ञान धर्माशिवाय आंधळे आहे. विपश्यना हे तेच विज्ञान आहे जे मानवाला केवळ भौतिक माहिती देत नाही, तर त्या माहितीचा स्वतःच्या प्रगतीसाठी आणि मानसिक शांततेसाठी वापर कसा करायचा, हे शिकवते.

जेव्हा आपण क्वांटम फिजिक्सच्या नजरेतून विपश्यनेकडे पाहतो, तेव्हा आपल्याला जाणवते की बुद्धांनी २५०० वर्षांपूर्वी जे सांगितले होते, ते निव्वळ तत्त्वज्ञान नसून ते सृष्टीचे परिपूर्ण विज्ञान होते.

हे दोन्ही मार्ग आपल्याला एकाच महान सत्याकडे नेतात, जे बाहेर आहे, तेच आत आहे; आणि जे सूक्ष्म आहे, तेच विशाल आहे.

# घटस्फोट : वैयक्तिक निर्णय की सामाजिक अपयश?



सौ. तृप्ती शहा
पुणे.

अरे बापरे, आता हे कोणाचं? काही वर्षांपूर्वी हा प्रश्न ऐकला की मन सुन्न व्हायचं. आज मात्र तोही प्रश्न सहजपणे विचारला जातो. कारण घटस्फोट ही संकल्पना आता समाजात कॉमन होत चालली आहे. लग्नाला वर्षही पूर्ण न झालेलं असतं, थाटामाटात, फाईव्ह स्टारमध्ये झालेलं लग्न असतं आणि तरीही नातं तुटतं. यात केवळ दोन व्यक्तीच नव्हे, तर दोन्ही कुटुंबांना मानसिक, सामाजिक आणि आर्थिक फटका बसतो.

**घटस्फोटाची लक्षणे :**

घटस्फोट अचानक होत नाही. त्याआधी काही लक्षणे दिसू लागतात-.

संवादाचा अभाव, सततचे गैरसमज

एकमेकांबद्दलचा आदर कमी होणे

संशय, अविश्वास, मोबाईल/सोशल मीडियावरून वाद

घरगुती जबाबदाऱ्यांवरून सतत तणाव

मीच बरोबर ही मानसिकता

दुर्दैवाने ही लक्षणे वेळेत ओळखली जात नाहीत किंवा आपोआप ठीक होईल या भ्रमात दुर्लक्षित केली जातात.

**घटस्फोटाची कारणे :**

घटस्फोटामागे अनेक कारणे असतात.

अपेक्षांचा विसंगती : लग्नापूर्वी स्वप्नं वेगळी आणि प्रत्यक्षात वास्तव वेगळं

आर्थिक ताणतणाव, करिअरची स्पर्धा

स्त्री-पुरुष भूमिकांबाबतचा बदलता दृष्टिकोन

अहंकार, सहनशीलतेचा अभाव

कुटुंबाचा हस्तक्षेप किंवा आधाराचा अभाव

या सगळ्यात चूक कोणाची? हा प्रश्न कायम राहतो. मुलगा की मुलगी? पण सत्य हेच की दोघांनाही स्वतःची बाजू योग्य वाटत असते आणि दोघेही एकमेकांवर बोट दाखवत राहतात.

**घटस्फोटाचे परिणाम :**

घटस्फोटाचे परिणाम केवळ पती-पत्नीपुरते मर्यादित राहत नाहीत.

मुलांच्या मनावर खोल मानसिक परिणाम

पालकांमध्ये असुरक्षिततेची भावना

समाजात विवाहसंस्थेबद्दल भीती

लग्न करावं की नाही? असा प्रश्न पुढील पिढीसमोर

आज अनेक पालकांना वाटू लागलं आहे की मुलाचं/मुलीचं लग्न लावायचं की अविवाहित राहणंच बरं? तर तरुणांना भीती वाटते- समोरची व्यक्ती आयुष्याची साथ देईल की केवळ पगाराची पुंजी घेऊन निघून जाईल?

**उपाययोजना : संवाद, समुपदेशन आणि समाजाची भूमिका**

समस्या आहे तर उपायही आहेत. मात्र आजची मोठी अडचण म्हणजे-मध्यस्थ, समुपदेशक (Counselor) यांची भूमिका घेणारे फारसे पुढे येत नाहीत. जसे वधू-वर मेळाव्यांमधून विवाह जुळवले जातात, तसेच लग्नपूर्व आणि लग्नोत्तर समुपदेशन ही काळाची गरज बनली आहे.

कधी कधी सोनारालाच कान टोचावे लागतात. म्हणजे योग्य ठिकाणी योग्य हस्तक्षेप आवश्यक असतो.

**वधू-वर मेळावा : केवळ लग्नासाठी नव्हे, संसार वाचवण्यासाठी**

आज वधू-वर मेळाव्यांमध्ये लग्नपूर्व समुपदेशन, अपेक्षा, जबाबदाऱ्या, आर्थिक नियोजनावर मार्गदर्शन घटस्फोटाच्या उंबरठ्यावर असलेल्या जोडप्यांसाठी २ ते ३ समुपदेशन सत्रे.... अशी व्यवस्था केली, तर घटस्फोटाचे प्रमाण निश्चितच कमी होऊ शकते. यामुळे वधू-वर मेळाव्यांनाही समाजात एक नवी, सकारात्मक ओळख मिळेल-नाती जुळवणारी आणि नाती वाचवणारी संस्था अशी.

शेवटी, घटस्फोट हा शेवटचा पर्याय असावा, पहिला नाही. थोडा संवाद, थोडी समजूत, योग्य वेळी मिळालेलं मार्गदर्शन आणि समाजाची संवेदनशील भूमिका - यातूनच अनेक संसार वाचू शकतात.आज पाऊल उचललं नाही, तर उद्या नात्यांवरचा विश्वासच ढासळण्याची भीती आहे.

■ ■ ■

# बंदी असतांना जिवघेणा मांजा येतो कुठून?




कायदे, अटी, नियम, बंदी अस्तित्वात असूनही नायलॉन मांजाची खरेदी-विक्री दिसून येते. नायलॉन मांजाची विक्री होऊ नये म्हणून प्रशासन सज्ज असते व आहे. प्रशासन मांजाच्या दुकानावर छापे टाकते. तिथे कोठेही मांजा सापडत नाही किंवा दिसत नाही. नेमक्या मकरसंक्रांतीला नायलॉन मांजा कुठुन येतो? हा आताही गंभीर प्रश्न आहे.

प्रशासनाने ऑनलाईन खरेदी- विक्रीकडे करडी नजर ठेवण्याची नितांत गरज आहे. तेथुनच नायलॉन मांजावर ब्रेक लावता येईल. पोलिसांची सक्त कारवाई आणि निरअपराध लोकांचा जाणारा जीव किंवा दुर्घटना हे डोळ्यांनी दिसत असून सुद्धा नायलॉन मांजा विक्रेता व खरेदीदारांना समज आली नाही.

मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजाच्या विक्री व खरेदीवर बंदी आहे. तरीही नायलॉन मांजाची विक्री सर्रास सुरू असल्याचे अनेक भागांत दिसून येते. राज्यातील अनेक भागांत नायलॉन मांजाची आवक उत्तर प्रदेशच्या बरेली आणि गुजरातच्या वडोदरा येथून होत असल्याचे सांगितले जाते.

नायलॉन मांजा मानव आणि पशु-पक्षांसाठी जीवघेना व अत्यंत घातक आहे त्यामुळे नायलॉन मांजाचा बहिष्कार सर्वच स्तरातून होने अत्यंत गरजेचे आहे. सर्वसामान्यांनी नायलॉन मांजाच्या विरोधात ॲक्शन मोडमध्ये येण्याची नितांत गरज आहे. राज्यातील अनेक भागांत नायलॉन मांजामुळे गंभीर घटना घडल्या आहेत, आताही घडतच आहेत.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

कोणत्याही दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता नायलॉन मांजाचा सर्वच स्तरातून बहिष्कार होणे अत्यंत आवश्यक आहे. याकरिता नागरिकांनीच प्रथम पाऊले उचलले पाहिजे तेव्हाच प्रशासनाला कारवाई करण्यास मोठी मदत नागरिकांकडून मिळेल.

एखाद्या विजेच्या ताराला जर पतंग अडकली तर विजेचे तार एकमेकांवर आदळतात व त्याचा स्पार्क होतो. अशा वेळेस पतंग उडविणाऱ्याला कदाचित आपले प्राणसुध्दा गमवावे लागते. पोलिस विभाग नायलॉन मांजाच्या बाबतीत सतर्कता बाळगुन लाखो रुपयांचा नायलॉन मांजा रोज जप्त करीत आहे. परंतु प्रश्न आहे की, मांजा येतो कोठुन याची प्रशासनामार्फत शहानिशा झाली पाहिजे.

सरकारने लक्ष केंद्रित करून नायलॉन मांजा बाबतीत योग्य ते पाऊल उचलावे व नागरिकांनी पोलिस प्रशासनाला सर्वतोपरी मदत करावी.

■ ■

# डायबिटीजवर परमानंट उपाय सापडला... नवे संशोधन काय ?




डायबिटीज रुग्णांना कायम औषधे आणि नियमित व्यायाम आणि तसेच आहारातील बदल अशी जीवनशैली स्वीकारायला लागते. भारत तर जगाची डायबिटीजची राजधानी बनली आहे. मात्र डायबिटीजवर संशोधन करणाऱ्या संशोधकांना इन्सुलिन निर्मितीवर यश आले आहे.

जर तुमच्या घरात कोणाला डायबिटीज असेल तर आता चिंता करण्याची काही गरज नाही. जर्मन संशोधकांनी नव्या पॅन्क्रियाटिक पेशींना तयार करुन टाईप - १ डायबिटीजला मूळापासून बरे करण्याचा उपाय शोधला आहे.

डायबिटीज रुग्णांच्या शरीरात जास्त शुगर असेल तर या रुग्णांना इन्सुलिनची गरज लागते. त्यामुळे त्यांना इन्सुलिन इंजेक्शनची गरज लागते. मात्र या नव्या थेरपीनंतर जर्मनीतील ही आधुनिक थेरपी मानवाच्या रुग्णांना आता वारंवार इन्सुलिन इंजेक्शन घेण्याची गरज नाही.

या नव्या तंत्रज्ञानामुळे टाईप - १ डायबिटीजच्या रुग्णांना दिलासा मिळाला आहे. उपचारानंतर 18 महिन्यानंतरही ८२ टक्के रुग्ण आता संपूर्णपणे बरे आहेत. त्यांना कोणत्याही औषधांची गरज नाही.

शरीरातील इन्सुलिन तयार करण्याची नैसर्गिक क्षमता पुन्हा सुरु करते.त्यामुळे ज्यांच्या शरीरात जन्मापासूनच इन्सुलिन तयार होत नाही (टाईप - १ ) त्यांना दिलासा मिळाला आहे.

जर्मनीतील नव्या संशोधनामुळे आता या टाईप - १ रुग्णांना दरवेळी ग्लुकोज तपासण्याच्या तणावातून मुक्ती मिळाली आहे. टाईप - १ चे रुग्ण आता त्यांचे दैनंदिन आयुष्य आनंदाने व्यतित करु शकतात.

सध्या हे तंत्रज्ञान नवीन असल्याने खूप खर्चिक आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना परवडणारे नाही. मात्र भविष्यात हे तंत्रज्ञान सर्वसामान्याच्या आवाक्यात येईल त्यामुळे डायबिटीज रुग्णांचा फायदा होणार आहे.

जर्मनीतील हा सफल प्रयोग भविष्यात जगभरातील कोट्यवधी डायबिटीजसाठी वरदान सिद्ध होऊ शकतो.त्यामुळे ज्यांना टाईप १ डायबिटीज असलेल्यांना दिलासा मिळणार आहे. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### हास्यालंकार

परिस्थिती येवो कोणतीही
मनाला द्यावी शिकवण
चेहऱ्यावरील स्माईल भौ
कमी होऊ देणार नाही तसूभर

हास्याचे उडता कारंजे
मन होई ताजे-ताजे
तणावाला मिळते मुक्ति
जिवनाला मिळते शक्ति..!

सर्व अलंकारात असे
हास्यालंकार भारी
कुण्याही सराफाच्या
दुकानावर मिळेना संसारी ..



# बालांगण

## सांता क्लॉजची गोष्ट

**नोर्वेजियन लोककथा**



खूप वर्षांपूर्वी नॉर्वेमधील फ्रॉस्टविकया गावात निकोलस नावाचे आजोबा राहत होते. स्नो बन हा गोड बोलणारा ससा त्यांचा मित्र होता. निकोलस कुणाला मदत करायला जात असले की तो देखील त्यांच्याबरोबर जाई. एका रात्री जंगलातून विचित्र आवाज आले. बर्फाचे वादळ मोठ्या वेगाने गावाकडे येत होते. त्या वादळात आकाशातील ताऱ्यांचा प्रकाश फिकट झाला होता. हवेत बर्फाचे छोटे छोटे तुकडे चमकत होते. मुलांना सुरक्षित ठेवण्यासाठी निकोलस आणि स्नो-बन मुलांना घेऊन जंगलातील ग्लो-केव्ह नावाच्या गुहेकडे निघाले. वादळ, वीज, वारा कशाचाही परिणाम त्या गुहेवर होत नसे. फायरफ्लेक नावाचा हिम-देव त्या गुहेचा मालक होता. वाटेत त्यांना फ्रॉस्ट वुल्व्हज या बर्फाच्या लांडग्यांनी मदत केली. इतक्यात वादळाची थंड वीज पडली आणि बर्फाने सगळा मार्ग अडवला. आकाशात ऑरोराचा लाल-हिरवा प्रकाश चमकला आणि त्यातून फायरफ्लेक खाली उतरला. फायरफ्लेकने त्याची लाल टोपी झटकली. त्यातून निकोलसला चमकदार लाल कोट, लाल टोपी, आणि जादूने चमकणारी पांढरी दाढी दिली. त्या जादूच्या पोषाखामुळे अंधार नाहीसा झाला. निकोलसच्या हातात कितीही लहान किंवा मोठी होऊ शकणारी जादुई थैली दिली. त्यात थंडी नाहीशी करणारी ऊब होती. निकोलस आणि फ्रॉस्ट वुल्व्हजने सगळ्या मुलांना ऊबदार थैलीत ठेवून दिले. मग फायरफ्लेकने स्नो-बनला जादूचे पंख दिले. स्नो-बन आनंदाने उडू लागला. त्याच्या उजेडात फ्रॉस्ट वुल्व्हजनी बर्फाचा रस्ता साफ केला आणि मुलांना ग्लो-केव्हपर्यंत सुरक्षित नेले. वादळ थांबल्यावर गावातील लोक गुहेपाशी जमले. आपली मुले सुरक्षित आहेत हे पाहून सर्वांना आनंद झाला. त्यांनी प्रेमाने निकोलसला लाल कपड्यातला सांता म्हणायला सुरुवात केली.

## मौल्यवान हिरा

**खनिजांची माहिती**

अहाना इनामदार



हिरा हा पृथ्वीतील सर्वात कठोर आणि सुंदर खनिज आहे. हिरा मुळात कार्बनपासून बनतो. पण तो पृथ्वीच्या खालच्या खोल थरांत खूपच जास्त उष्णता आणि प्रचंड दाबाखाली तयार होतो. पृथ्वीच्या आत खोलवर हजारो वर्षे हे कार्बनचे अणू दाबले जातात आणि हळूहळू कठीण, चमकदार हिऱ्यात बदलतात. पृथ्वीच्या आतून गरम लाव्हा वर येतो. त्याच्यासोबत हे हिरेही खडकांमध्ये अडकून वरच्या थरांपर्यंत पोहोचतात.

जगात हिरे प्रामुख्याने आफ्रिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, आणि ब्राझील या देशांत मिळतात. विशेषतः आफ्रिकेतील बोट्सवाना, दक्षिण आफ्रिका आणि कांगो हे देश हिऱ्यांसाठी प्रसिद्ध आहेत. भारतातही पूर्वी गोवळकोंडा भागात खूप सुंदर आणि मोठे हिरे मिळत असत.

हिरा जमिनीतून काढण्यासाठी अनेक पद्धती वापरल्या जातात. काही ठिकाणी जमिनीवर मोठे खड्डे करून खडक काढतात. काही ठिकाणी जमिनीखाली खोल बोगदे करून खाणकाम केले जाते. तसेच नद्यांच्या वाळूतही लहान-लहान हिरे आढळतात. खडक बाहेर काढल्यानंतर त्या खडकांचे तुकडे करून ते मशीनमध्ये टाकले जातात. मशीनमध्ये खडक बारीक करून त्यात मिसळलेले हिरे वेगळे केले जातात. हिरे जड असल्यामुळे पाण्यात खाली बसतात आणि उरलेले हलके दगड वर राहतात.

मिळालेले हिरे खूपच कच्च्या आणि खडबडीत रूपात असतात. त्यांना सुंदर बनवण्यासाठी त्यांची कापणी आणि घासणी केली जाते. एका कच्च्या हिऱ्याला चमकदार, पारदर्शक आणि सुंदर आकार देण्यासाठी तज्ज्ञ लोक विशेष मशीन वापरतात. यामुळे हिरा खूप उजळ आणि चमकदार दिसतो. हिरे मौल्यवान आहेत कारण ते खूप खोल जमिनीत तयार होतात. त्यांना तयार व्हायला लाखो वर्षे लागतात. ते फार दुर्मिळ आहेत. त्यांच्या कणखरपणामुळे आणि चमकदार रूपामुळे ते दागिने, मुकुट, खास वस्तू, तसेच काही यंत्रांमध्येही वापरले जातात. हिरा हे जगातील अत्यंत दुर्मिळ,खास आणि महागडे रत्न मानले जाते.

## स्वागताला सज्ज कोण?

**भन्नाट**



तुम्ही कोणाच्या घरी पाहुणे म्हणून गेलात आणि घरातल्या मुलांनी त्यांच्या आई-बाबांना ओरडून सांगितलं की बघा कोण आलंय, तर तुम्हाला कसं वाटेल? तुम्हाला दारातच उभं करून मुलं खेळायला किंवा त्यांच्या कामाला गेली तर आई-वडिलांनी त्यांना काहीच शिकवलं नाही असंच तुम्हाला आणि तुमच्या आई-बाबांना वाटेल. बरोबर ना. म्हणूनच तुम्हीही तुमच्या घरी आलेल्या पाहुण्यांशी नीट वागायला हवं. त्यांचं स्वागत करायला हवं.

तुम्ही एक चित्र डोळ्यासमोर आणा. तुमच्या घरात तुम्ही टिव्ही पाहताय, खेळायला जायची तयारी करताय किंवा अभ्यास करताय. आई कामात आहे. बाबाही लॅपटॉपवर बिझी आहेत. अचानक तुमच्या घराची बेल वाजते. तुम्ही जाऊन दार उघडता. पाहुणे आल्याचं तुम्ही आईला ओरडून सांगता आणि पुन्हा तुमच्या कामाला लागता किंवा खेळायला घराबाहेर पळता. ओळखीचं कोणी असेल तर तुम्ही फार फार तर नमस्कार करता.

अशा वेळी तुमची आई येईपर्यंत पाहुण्यांना दारातच उभं राहावं लागतं. तुम्हाला या वागण्यात काही वावगं वाटत नाही. पण आलेल्या पाहुण्यांना तुमचं वागणं नक्कीच आवडणार नाही.

आलेल्या पाहुण्यांचं स्वागत करणं हे काम आई-बाबांचं. आपला त्याच्याशी काहीच संबंध नाही असा विचार आजची मुलं करतात. पण घर तुमचंही असतं. त्यामुळे आलेल्या पाहुण्यांचं तुम्हीही नीट स्वागत करायला हवं. आई-बाबा येईपर्यंत पाहुण्यांना बसायला सांगून पाणी विचारायला हवं. आजी-आजोबा किंवा ज्येष्ठ व्यक्ती घरी आल्या तर त्यांना वाकून नमस्कार करायला हवा.

पाहुण्यांना बसवून तुम्ही थोडा वेळ त्यांच्याशी गप्पा मारू शकता. त्यांच्यासोबत लहान मुलं असतील तर त्यांच्याशी खेळू शकता. थोड्या मोठ्या वयाची मुलं सरबत आणि आणि खाऊ पाहुण्यांना देऊ शकतात.

आई-बाबा आपलं काम आटोपून येईपर्यंत तुम्ही पाहुण्यांना वेळ द्यायला हवा. खेळायला मित्रमंडळी बोलवत असतील तर त्यांना तुम्ही थोडा वेळ थांबायला सांगू शकता किंवा एखाद्या दिवशी खेळायला दांडीही मारता येते. पाहुण्यांशी तुम्ही गप्पा मारल्यात तर त्यांनाही बरं वाटेल आणि तुमचं कौतुकही होईल. त्यामुळे पुढच्या वेळी पाहुणे तर स्वतःहून त्यांचं स्वागत करा.



## करियर नर्सिंगमधलं

**कोण होणार?**


मित्रांनो, रूग्णालयात गेल्यावर डॉक्टरांबरोबर नर्स म्हणजे परिचारिकाही धावपळ करताना दिसतात. या परिचारिका रूग्णांची मनोभावे सेवा करतात. रूग्णसेवा किंवा समाजासाठी काही करायची इच्छा असेल तर तुम्हीही नर्सिंगमधल्या करीअरचा विचार करू शकता. या क्षेत्रात तुम्ही उत्तम करीअर घडवू शकतात. या क्षेत्रातल्या संधींविषयी जाणून घेऊ या...

नर्सिंगच्या क्षेत्रात बरंच काही नवं घडतं आहे. वैद्यकीय क्षेत्रात होणाऱ्या बदलांचा सकारात्मक परिणाम नर्सिंगमध्येही पहायला मिळतो आहे. नर्सिंगचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर परदेशातही उत्तम संधी मिळू शकते. कार्यक्षमतेनुसार नर्सच्या कामाची विभागणी केलेली असते. हॉस्पिटल्स तसंच नर्सिंग होम्समध्ये काम करणारी नर्स, गरोदर महिलांची काळजी घेणारी नर्स तसंच ग्रामीण भागातल्या लोकांना आरोग्यसेवा पुरवणारी नर्स अशी त्यांची विभागणी केलेली असते.

वैद्यकीय क्षेत्रात नवतंत्रज्ञान येत आहे. वैद्यकीय पर्यटनाचं प्रमाण वाढतं आहे. उपचारांसाठी अनेक जण भारताला पसंती देत आहेत. त्यामुळे नर्सची जबाबदारी वाढली आहे. विशेष अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही याच्या संबंधित सर्व क्षेत्रांमध्ये कौशल्य मिळवू शकता. कार्डिओलॉजी, नेफोलॉजी, क्रिटिकल केअर, ऑन्कॉलॉजी या विषयांमध्ये मास्टर पदवी, एमफील किंवा पीएचडी करता येते. नर्सिंगचा प्राथमिक अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर रूग्णालयं, नर्सिंग होम्समध्ये संधी मिळू शकते. अनुभव आणि कौशल्याच्या बळावर भविष्यातल्या विपुल संधी खुल्या होतात. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर नर्सिंग अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. तेव्हा रुग्णसेवेची आवड असेल तर हे क्षेत्र तुमचंच आहे असं समजा.

## हृदयाची धडधड करेल फोन अनलॉक

**स्मार्ट टेक**



सध्या टेक्नॉलॉजीचा वापर प्रचंड वाढला आहे. लोकांना अधिकाधिक सुलभता हवी आहे. यासाठी संशोधकांनीही कंबर कसली आहे. स्मार्टफोन तसंच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या सुरक्षेची पातळी वाढवण्यासाठीही प्रयत्न केले जात आहेत. हॅकर्स, मालवेअर, रॅन्समवेअरच्या हल्ल्यांपासून बचाव करण्यासाठी नवनवे मार्ग शोधले जात आहेत. म्हणूनच नव्या स्मार्टफोन तसंच अन्य गॅझेट्समध्ये बायोमॅट्रिक फीचर्स देण्यात येत आहेत. गॅझेटच्या सुरक्षेसाठी अशा नव्या फीचर्सचा समावेश करणं गरजेचं झालं आहे. यासोबतच सुरक्षेच्या दृष्टीने वेगवेगळ्या तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. की पॅडवर अल्फान्यूमेरिक डिजिटचा वापर करणं, फोनमध्ये विशिष्ट प्रकारच्या पॅटर्नचा वापर करणं, चेहऱ्यावरून ओळख पटवणं अशा तंत्रज्ञानाचा वापर आता केला जात आहे. स्मार्टफोन तसंच इतर गॅझेट्सच्या सुरक्षेसाठी शास्त्रज्ञांनी आणखी एका नव्या तंत्रज्ञानाचा शोध लावला आहे. फोन किंवा लॅपटॉप अनलॉक करण्यासाठी आता चेहरा किंवा फिंगरप्रिंटची गरज भासणार नाही. तुमच्या हृदयाची धडधड ऐकून स्मार्टफोन ओपन होईल. बफेलो विद्यापीठाच्या संशोधकांनी या नव्या तंत्रज्ञानाचा शोध लावला आहे. त्यांनी एका रिमोट बायोमॅट्रिक टूलचा शोध लावला आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात या अनोख्या शोधाचं खूप कौतुक होत आहे. इतर पद्धतींच्या तुलनेत हा नवा प्रकार अधिक सुरक्षित असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. हे तंत्रज्ञान अवघ्या आठ सेकंदात तुमच्या हृदयाची धडधड ऐकून ओळख पटवेल. एका मॉनिटरद्वारे तुमच्या हृदयाचं मॉनिटरिंग केलं जाईल. यामुळे दुसरी व्यक्ती तुमच्या गॅझेट्सचा वापर करू शकणार नाही.

## कसं चालतं वायरलेस चार्जरचं काम?

**स्मार्ट नॉलेज**



छोट्या दोस्तांनो, तुम्ही वायरलेस चार्जरबद्दल ऐकलं असेल. नव्या स्मार्टफोन्समध्ये वायरलेस टेक्नॉलॉजीचा वापर केला जातो. आयफोन ८, आयफोन ८ प्लस, आयफोन एक्स, सॅमसंग गॅलेक्सी एस ८, गॅलेक्सी एस ७, नोट ८ अशा फोन्समध्ये ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्थात यामुळे स्मार्टफोन युजर्सना नव्या टेक्नॉलॉजीचा पुरेपुर वापर करता येणं शक्य होणार आहे. ही वायरलेस टेक्नॉलॉजी काय आहे? तिचं काम चालतं कसं? याविषयी...

**कसं चालतं काम?**

बऱ्याच वायरलेस चार्जरमध्ये मॅग्नेटिक इंडक्शनचा वापर केला जातो. यामुळे डिव्हाइस चार्ज करण्यासाठी युजर्सना वायरची गरज भासत नाही. डिव्हाइस चार्जरवर ठेवल्यानंतर चार्जिंग सुरू होतं. ही टेक्नॉलॉजी प्रत्यक्षात वायरलेस नसते. तुमचा स्मार्टफोन, स्मार्टवॉच, वायरलेस हेडफोन्ससारखी उपकरणं चार्ज करण्यासाठी वायरची गरज लागत नाही. पण वायरलेस चार्जरचं काम सुरू राहावं यासाठी तो प्लगमध्ये जोडावा लागतो. असे चार्जर मॅग्नेटिक इंडक्शन या तंत्रज्ञानावर काम करतात. याचा अर्थ ऊर्जा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवण्यासाठी चार्जर मॅग्नेटिझमचा वापर करतात. वायरलेस चार्जरला सपोर्ट करण्यासाठी उपकरणात योग्य हार्डवेअर असणं गरजेचं आहे. योग्य हार्डवेअरशिवाय फोन चार्ज होणार नाही.

**ॲपलने केला बदल**

सुरूवातीला ॲपलने आपल्या स्मार्टफोन्समध्ये वायरलेस तंत्रज्ञानाचा वापर केला नव्हता. पण आता त्यांनीही नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे. आयफोन८, ८ प्लस आणि एक्स या नव्या फोन्समध्ये त्यांनी वायरलेस चार्जिंगचे फीचर जोडलं आहे. नव्या फोनमध्ये क्यूआय वायरलेस चार्जिंग आहे.

**काय आहे क्यूआय टेक्नॉलॉजी?**

असे चार्जर मॅग्नेटिक रेजोनेन्सलाही सपोर्ट करतात. क्यूआय टेक्नॉलॉजीवाले चार्जर ४५ मिलीमीटर अंतरावरूनही काम करतात. चार्जर टेबलावर किंवा इतर ठिकाणी ठेऊनही डिव्हाइस चार्ज करता येतं. एका चार्जिंग पॅडवर एकापेक्षा जास्त डिव्हाइस चार्ज करता येतात.

**कसा करायचा वापर?**

वायरलेस चार्जरचा वापर करणं खूप सोपं आहे. वायरलेस चार्जरचा वापर करण्यासाठी वायरलेस चार्जिंगला सपोर्ट करणाऱ्या स्मार्टफोनची गरज भासेल.

## ॲटलास पर्वतरांग

**ओळख पर्वतांची**

ॲटलास पर्वतरांग उत्तर आफ्रिकेत पसरलेली एक विशाल आणि प्राचीन पर्वतशृंखला आहे. ही रांग प्रामुख्याने मोरोक्को, अल्जेरिया आणि ट्युनिशिया या तीन देशांतून जाते. ही पर्वतरांग अटलांटिक महासागराच्या जवळ सुरू होऊन सहारा वाळवंटाच्या काठापर्यंत पसरलेली आहे. ॲटलास पर्वत वेगवेगळ्या भागात विभागलेले आहेत. उच्च ॲटलास, मध्यम ॲटलास आणि लहान ॲटलास. प्रत्येक विभागाची उंची, हवामान आणि भूभाग वेगवेगळे आहेत. येथील सर्वात उंच शिखर म्हणजे मोरोक्कोमधील जिबेल तूबकाल. हे आफ्रिकेतील उंच शिखरांपैकी एक आहे.



इथल्या नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी नसले तरी मौलुईया नदी, सूस नदी आणि ड्राआ नदी या महत्त्वाच्या नद्या आहेत. या नद्या पर्वतातील बर्फ वितळल्यावर आणि पावसाळ्यात वाहतात. पर्वतरांगांच्या आसपास काही दऱ्या आणि लहान तलावही आढळतात.

ॲटलास पर्वतरांगातील हवामान भागानुसार बदलते. उंच भागात हिवाळ्यात बर्फ पडतो. खाली असलेल्या दऱ्यांमध्ये कोरडे आणि उष्ण वातावरण असते. त्यामुळे इथे विविध प्रकारची झाडे आढळतात. उंच भागात देवदार, फर, ओक आणि पाईनसारखी झाडे आहेत. कोरड्या भागात खजुराची झाडे, बदामाची झाडे आणि काटेरी झुडपे आहेत तर काही भागात थोडीफार फळझाडेही दिसतात. इथले प्राणीही हवामानानुसार बदलतात. उच्च ॲटलासमध्ये डोंगरी शेळ्या, हरिण, कोल्हे, अस्वले आणि बिबटे दिसतात. कोरड्या भागात उंट, ससा, विविध जातीचे पक्षी आणि सरडे आढळतात. बार्बरी माकडासारखे दुर्मिळ प्राणी ॲटलास पर्वतात सापडतात.

या पर्वतरांगेत अनेक आदिवासी जमाती राहतात. त्यातील बर्बर जमात हजारो वर्षांपासून इथे राहत असून त्यांची भाषा, पोशाख, घरांची रचना आणि परंपरा खूप वेगळ्या आणि समृद्ध आहेत. ते आजही पर्वतात शेती करून आणि जनावरे पाळून उपजीविका करतात. ॲटलास पर्वत आपल्या नैसर्गिक सौंदर्य, इतिहास आणि संस्कृती यांचे दर्शन घडवणारा महत्त्वाचा प्रदेश मानला जातो.

**फॅशन पॅशन**

### घाला बांबूची टोपी...



छोट्या दोस्तांनो, तुम्ही दिवाळीच्या सुटीनंतर जंगल सफारीला जाणार असाल तर बांबूपासून बनवलेली टोपी विकत घ्या. निसर्गाच्या जवळ जाताना नैसर्गिक पदार्थांपासून बनवलेल्या वस्तू वापरायला हव्या. बांबूची टोपी खूप छान दिसते, शिवाय ती आरामदायीही असते. या टोपीमुळे तुम्हाला फंकी लूक मिळेल. टोपीचं वजन कमी असल्याने ती फार जड वाटणार नाही. अशा टोप्यांमुळे थंडावा मिळतो तसंच उन्हापासून बचाव होतो.

**स्मार्ट टिप्स**

### रिसायकल युवर जीन्स



मित्रांनो, जीन्स हा आपल्या वॉर्डरॉबमधील अविभाज्य भाग आहे. तुमच्याकडे जुन्या जीन्स असतील तर वेगळ्या पद्धतीने त्याचा वापर करता येऊ शकतो. जीन्स कापून शॉर्ट बनवता येईल. जीन्सला वेगळा आकार देता येईल. जीन्सपासून डेनिम बॅग बनवू शकता. अशी बॅग बाहेरूनही बनवून घेता येईल. ही बॅग शाळेत किंवा क्लासमध्ये कॅरी करू शकता. जीन्सपासून नॅपकिन्स बनवता येतील.

**खादाडी**


### चॉकलेट क्ले



दोस्तांनो, तुम्हाला चॉकलेट आवडत असेल. चॉकलेटपासून तुम्ही चॉकलेट क्ले तयार करू शकता. यासाठी चॉकलेट कॅन्डी मेल्टस, व्हाईट कॉर्न सिरप, प्लास्टिक बॅग आणि मायक्रोवेव्ह सेफ बाउल अशा वस्तू लागतील. सर्वात आधी मायक्रोवेव्ह बाउलमध्ये १० अंशापर्यंत चॉकलेट कॅन्डी मेल्टस घाला. थोडं वितळेपर्यंत मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. त्यात पाउण कप व्हाईट कॉर्न सिरप घाला. हे मिश्रण एकत्र करा. मिश्रण चॉकलेटच्या गोळ्यासारखं दिसायला हवं. आता हा चॉकलेटचा गोळा प्लास्टिक पिशवीत ठेवा. तासभर सेट होऊ द्या. नंतर वेगवेगळ्या साच्यांचा वापर करून तुम्ही या चॉकलेटला छान आकार देऊ शकता.

**दोस्त हे मस्त**

### ब्लू फुटेड बॉबी



ब्लू फुटेड बॉबी या पक्ष्याचे पाय निळे असतात. त्यामुळे हे नाव पडलं आहे. हे पक्षी रात्री झाडावर नव्हे तर जमिनीवरच झोपतात. समुद्रातले मासे हे त्यांचं खाद्य आहे. नर-मादी पिलांची काळजी घेतात. पक्षी साधारणपणे सतरा वर्षं जगतात.

# केंद्रीय मंत्री गडकरींनी साधला मतदारांशी संवाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :





शहरातील प्रत्येकाला सर्वोत्तम नगरी सुविधा मिळाव्यात, नागपूरचा सुखांक मोठा व्हावा हीच माझी इच्छा आहे. स्थिर नेतृत्व, पारदर्शक कारभार आणि विकासाची गती कायम ठेवायची आहे, असे सांगत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर शहराच्या विविध प्रभागातील मतदारांशी संवाद साधला.

प्रभाग क्रमांक ३७ मधील महायुती उमेदवारांच्या प्रचारार्थ राधे मंगलम येथे आयोजित ज्येष्ठ नागरिक व विविध परिवार संस्था संवाद बैठकीत ते बोलत होते. त्याचवेळी प्रभाग क्रमांक ३८ आणि प्रभाग ३६ मधील महायुती उमेदवारांच्या प्रचारार्थ देखील गडकरी यांनी संवाद साधला.

यावेळी महानगर भाजप अध्यक्ष दयाशंकर तिवारी, महामंत्री रितेश गावंडे, माजी महापौर नंदाताई जिचकार, माजी जि. प. अध्यक्ष संध्याताई गोतमारे, नितीन महाजन, माजी उपमहापौर राजाभाऊ लोखंडे, शंकरराव भुते, रवी मुन्ने, शंकर पहाडे, विवेक तरासे, प्रभाग संयोजक विमलकुमार श्रीवास्तव, सहसंयोजक अजय डागा, योगेश थापे, प्रदीप चौधरी, अतुल गेडाम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गडकरी म्हणाले, रिंग रोड, पाण्याच्या टाक्या, २४ तास पाणीपुरवठा अश्या अनेक विकास कामांसाठी मी व भाजपच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी संघर्ष केला. काम पूर्ण केले. सर्वाधिक सिमेंट रस्ते नागपूर शहरात आहेत;

ड्रेनेज, पाणीपुरवठा, उद्याने, आरोग्य आणि शिक्षण त्यासाठी सिम्बॉयसिस, नरसी मोन्जी, ट्रिपल आयटी आणले. आरोग्य क्षेत्रात सातत्याने व दजेर्दार काम झाले आहे. एम्स, एनसीआय, उत्तम वैद्यकीय सेवा आपण सुरु केल्या. अनेक वर्षे प्रलंबित असलेले प्रकल्प प्रत्यक्षात उतरले असून योजना केवळ कागदावर न राहता जमिनीवर आल्या, याचे विशेष समाधान वाटते.

महानगरपालिकेच्या कारभाराबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, ई-टेंडरिंग, ऑनलाईन सेवा आणि थेट लाभ हस्तांतरण यामुळे महापालिकेचे कामकाज अधिक पारदर्शक झाले आहे. उत्तम दळणवळण सेवा नागपुरात आहे. करदात्याच्या पैशाचा योग्य आणि जबाबदारीने वापर करणे हा भाजपचा कायमचा आग्रह राहिला आहे.

केंद्र - राज्य - महापालिका यांच्यातील समन्वयावर भर देताना गडकरी म्हणाले, केंद्र व राज्यात भाजपची सत्ता असल्यामुळे निधी उपलब्धता, मंजुरी आणि प्रकल्पांची अंमलबजावणी वेगाने होते. या समन्वयाचा प्रत्यक्ष लाभ नागपूरकरांनी अनुभवला आहे.

सर्वसमावेशक विकासाची भूमिका स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, झोपडपट्ट्यांपासून सुसज्ज वस्त्यांपर्यंत सर्वांसाठी पायाभूत सुविधा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, महिला व युवकांसाठी योजना आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यावर भाजपने भर दिला आहे.

शेवटी बोलताना नितीन गडकरी म्हणाले, सक्षम नेतृत्व, अनुभवी नगरसेवक, अभ्यासू प्रशासकीय दृष्टिकोन आणि मैदानात सतत काम करणारी कार्यकर्त्यांची टीम यामुळे भाजपचे निर्णय जलद आणि परिणामकारक ठरतात.

पुढील पाच वर्षांचा स्पष्ट विकास आराखडा भाजपकडे तयार असून, नागपूरकरांनी संधी दिल्यास त्या संधीचे निश्चितच विकासात रूपांतर केले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### म्हणून मनपा शाळांचा दर्जा वाढला!

नागपुरातील महानगरपालिकांच्या शाळांचा दर्जा अतिउत्तम करण्यामध्ये प्रा. दिलीप दिवे यांचे विशेष योगदान आहे, असा उल्लेख गडकरी यांनी यावेळी केला. दलित आणि गरीब वस्त्यांमध्ये शिकणाऱ्या मुलांना उत्तम शिक्षण मिळावे यासाठी शिक्षण सभापती म्हणून दिलीप दिवे यांनी सीबीएससी किंवा इंग्रजी माध्यमातील शाळा सुरू होण्याकरिता सातत्याने दिल्ली, मुंबई येथे येऊन पाठपुरावा केला होता असेही गडकरी यावेळी म्हणाले.

# विज्ञान हा भारताचा मजबूत पाया



## कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे प्रतिपादन
## विदर्भ विज्ञान महोत्सव व प्रदर्शनाचे थाटात उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
विज्ञान म्हणजे केवळ एआय तज्ञ किंवा आयटी इंजिनिअर घडविण्याचे माध्यम नसून, ज्ञानातून नवे शोध निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. भारताने प्राचीन काळापासून विज्ञानाची कास धरली असून भारताचा विज्ञानाचा पाया मजबूत राहिला आहे, असे प्रतिपादन कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

विज्ञान भारती विदर्भ प्रदेश मंडळ व धरमपेठ एम. पी. देव स्मृती विज्ञान महाविद्यालय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या सहयोगाने आयोजित विदर्भ विज्ञान महोत्सव व विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी अंबाझरी तलावाजवळील धरमपेठ एम. पी. देव स्मृती विज्ञान महाविद्यालयाच्या परिसरात मंत्री लोढा यांच्या हस्ते झाले.

मंत्री लोढा पुढे म्हणाले की, भारताने जगाला शून्य दिले; आपली विचारसरणी वैज्ञानिक आहे आणि आपण जन्मतःच वैज्ञानिक आहोत. समाजासाठी कार्य करणारा सामान्य भारतीय आत्मविश्वासाने प्रगती करेल, तेव्हाच देश विकसित होईल. अपेक्षित भारत घडविण्याचे कार्य विज्ञान भारती करीत आहे, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना व्यासपीठावर बोलावून मनोगत व्यक्त करायला सांगितले. तीन विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

उद्घाटनप्रसंगी मंचावर पीडब्ल्यूडी नागपूर विभागाचे मुख्य अभियंता एस. एस. माने, लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य, विज्ञान भारतीचे क्षेत्र संघटन मंत्री श्री श्रीप्रसाद जी, संरक्षक डॉ. सतीश वटे, धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उल्हास औरंगाबादकर, सचिव प्रकाश इटनकर, धरमपेठ एम. पी. देव स्मृती विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अखिलेश पेशवे आणि अतुल मोघे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची प्रस्तावना करताना अध्यक्ष उल्हास औरंगाबादकर यांनी विद्यार्थ्यांनी सामाजिक समस्यांचा अभ्यास करून प्रयोग करावेत व अनुभवातून शिक्षण घ्यावे, असे आवाहन केले. एस. एस. माने यांनी शुभेच्छा दिल्या. डॉ. अतुल वैद्य यांनी विज्ञान भारतीच्या कायार्चा आढावा घेत विज्ञानाचा दुरुपयोग टाळण्यासाठी योग्य प्रचार व प्रसाराचे महत्त्व अधोरेखित केले.

या प्रदर्शनात नागपूर जिल्ह्यातील बी.एस्सी. व एम.एस्सी. विद्यार्थ्यांचे सुमारे ४० विज्ञान प्रकल्प सादर करण्यात आले आहेत. विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यांमध्ये क्लायमेट चेंज, वन हेल्थ आणि डिफेन्स या तीन मुख्य संकल्पनांवर आधारित रांगोळी, पोस्टर, विज्ञान मॉडेल व नाटिका स्पर्धा घेण्यात आल्या. त्यांची अंतिम फेरी येथे पार पडली.

संचालन व आभार प्रदर्शन डॉ. कीर्ती पातुरकर आणि रुमा कापरे यांनी केले. राजेश कारेमोरे, नरेंद्र सातफळे, कॅप्टन डॉ. प्रशांत आंबेकर, डॉ नितीन गायकवाड, सौ विनया काशीकर, सौ शोभा झळके, तसेच शिक्षक, कर्मचारी, एन सी सी कॅडेट्स रासेयो स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

> विज्ञान चळवळीचे अग्रणी जयंतराव सहस्त्रबुद्धे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २८ फेब्रुवारी हा विज्ञान दिन यापुढे जयंतराव सहस्त्रबुद्धे विज्ञान दिन म्हणून साजरा करण्याबाबत शासन निर्णय त्वरित काढण्यात येईल. शिक्षकांमध्ये विज्ञानविषयक जागृतीसाठी विज्ञान भारतीने राज्य सरकारशी सामंजस्य करावे आणि त्यासाठी ५ लाख रुपयांचे सहकार्य उपलब्ध करून देण्यात येईल, असेही लोढा यांनी यावेळी जाहीर केले.

# सत्ताधाऱ्यांच्या धाक, दडपशाहीमुळे जनता घाबरली....

## विजय वडेट्टीवार यांचा घणाघात



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
सत्ताधारी महायुतीच्या धाक, दडपशाहीमुळे जनता दहशतीत असल्याचा दावा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधताना केला.

महापालिकेच्या निवडणुकीत पातळी सोडून एकमेकांवर टीका केली जात आहे. अजित पवार व पुण्यातील एका स्थानिक आमदाराचे विधान ऐकले तर हे लोक एकमेकांच्या अंगावर तलवारी घेऊन धावून जायचेच राहिलेत, असे ते म्हणालेत.

वडेट्टीवार म्हणाले, महापालिकेच्या निवडणुकीत सध्या पातळी सोडून टीका केली जात आहे. काल अजित पवार व पुण्यातील एका स्थानिक आमदाराचे विधान ऐकले, तर हे लोक एकमेकांच्या अंगावर तलवारी घेऊन धावून जायचेच राहिलेत.

कुणी दरोडा म्हटले, तर कुणी औकात काढली. सत्तेत असणारे हे दोन्ही पक्ष ज्या पद्धतीने एकमेकांसोबत भांडत आहेत, त्यावरून सत्ता हीच त्यांच्यासाठी सर्वोच्च असल्याचे स्पष्ट होते. त्यांच्यात विचार कुठेच दिसत नाही.

या निमित्ताने महाराष्ट्रातील जनतेला त्यांची विचित्र भूमिका बघायला मिळत आहे. निवडणुकीत पोलिस व गुंडांचा वापर केला जात आहे. हे पाहून जनता घाबरली आहे. भाजप हा स्वच्छ पक्ष आहे का? असा प्रश्न या प्रकरणी उपस्थित होत आहे.

वडेट्टीवार म्हणाले, महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात सध्या राग व संताप दिसत आहे. परंतु जनता हतबल आहे असेच म्हणावे लागेल. कारण हे सरकार यंत्रणा, निवडणूक आयोग, पोलिस व गुंडांचा वापर करून चालवले जात आहे. तिन्ही पक्षांनी गुंडांचा आश्रय घेतल्यामुळे जनता दहशतीखाली जगत आहे. अन्यथा रस्त्यावर फिरू देणार नाही अशी अवस्था या या महाराष्ट्रात दिसली असती. अंबरनाथमध्ये आमचे नगरसेवक पळवले गेले. यामुळे भाजप हा स्वच्छ पक्ष आहे का? यांचा चेहरा स्वच्छ राहिला का? असा प्रश्न उपस्थित होत असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

## शिंदे गटाची परळीत
# एमआयएमशी युती

### मुबारक म्हणत ठाकरे गटाचा हल्ला



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेने परळी नगरपालिकेत असदुद्दीन ओवैसी यांच्या नेतृत्वातील एमआयएमशी हातमिळवणी केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने या प्रकरणी शिंदे गटावर सडकून हल्ला चढवत त्यांना बंड अन् तत्त्वांच्या गप्पा कायमच्या थांबवण्याचा टोला हाणला आहे.

अंबरनाथमध्ये भाजप व काँग्रेसने एकमेकांशी हातमिळवणी केली होती. अकोटमध्ये भाजपने सत्तेसाठी एमआयएमशी युती केली होती. या पार्श्वभूमीवर आता सत्ताधारी शिवसेनेने परळी नगरपालिकेत अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस व एमआयएमशी युती केली आहे. अंबादास दानवे यांनी आपल्या एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, एकनाथ शिंदे जी, परळी नगरपालिकेत शिंदे गट-एमआयएम-राष्ट्रवादीची जी युती झाली आहे, ती पाहून आता तुमच्या 'बंड' आणि 'तत्त्वांच्या' गप्पा कायमच्या थांबवा. राष्ट्रवादी नको नको म्हणता म्हणता, आता तुम्ही थेट 'एमआयएम-वासी' झालात? युती मुबारक हो.. असा टोला त्यांनी हाणला.

# गारठा वाढण्याचे संकेत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
विदर्भातील वातावरणात सातत्याने बदल पाहायला मिळत असून, गेल्या आठवड्यात हुडहूडी भरवणारी थंडी काहीशी ओसरली आहे. शुक्रवार ९ जानेवारी रोजी पारा चढल्याचे दिसून आले.

तथापि, रविवारपासून पुन्हा थंडी जोर पकडणार असून, गारठा वाढण्याचे संकेत आहेत. डिसेंबरच्या मध्यापासून विदर्भात थंडीने कहर केला होता. काही जिल्हयांमध्ये तापमान ८ अंश सेल्सिअसपर्यंत घसरले होते. कडाक्याच्या थंडीमुळे विविध प्रकारचे आजारही बळावल्याचे दिसून आले. आता पुन्हा थंडीचा प्रकोप पुढील काही दिवस जाणवणार असल्याचे संबंधित विभागाकडून सांगण्यात येत आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात चिमुकला ठार



■ महासागर प्रतिनिधी
गोंदिया, दि. ९ :
जिल्ह्यासह तिरोडा तालुक्यात मागील काही दिवसांपासून बिबट्यांचा संचार वाढला आहे. तिरोडा तालुक्यातील खडकी (डोंगरगाव) येथे शुक्रवार ९ जानेवारी रोजी बिबट्याच्या हल्ल्यात ४ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला.

हियांश शिवशंकर रहांगडाले रा. खडकी (डोंगरगाव) असे मृत बालकाचे नाव असून, तो आपल्या आई-वडिलांसोबत घराच्या मागील अंगणात चुलीजवळ बसलेला होता. याच वेळी दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक हल्ला करत चिमुकल्याला उचलून नेले.

पालकांनी आरडाओरड करत बिबट्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला; मात्र तो पसार झाला. हियांश शिवशंकर रहांगडाले याचा मृतदेह घरापासून काही अंतरावर मिळून आला.

# टाकाऊ तेलापासून उपयुक्त उत्पादन

## लोकरंग



आपल्या रोजच्या आहारात कोणत्याही ब्रँडच्या तेलाचा वापर हा आरोग्याच्या दृष्टिकोनातून घातकच असतो. परंतु त्याहीपेक्षा भयानक बाब म्हणजे एकदा उकळलेल्या तेलाचा पुनर्वापर हा हृदयरोगाला निमंत्रण देणारा ठरतो. वापरून थंड केलेल्या तेलामुळे शरीरातील कॉलेस्ट्रॉल वाढण्याचा धोका देखील असतो, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका देखील संभवतो. त्यामुळेच अशा एकदा वापरलेल्या आणि पुनर्वापर न करता येण्यासारख्या तेलापासून रोजच्या दैनंदिन वापरासाठी उपयुक्त अशी उत्पादन बनवता येण शक्य होऊ शकेल आणि आरोग्यावर होणारे दुष्परिणाम देखील टाळता येतील. हेच जाणून घेण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक विषयाचे अभ्यासक डॉ.अनिल धनेश्वर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**○ मुळात रोजच्या आहारात तेलाचे आरोग्याच्या दृष्टीने महत्व काय आहे?**

आपल्या रोजच्या आहारात आपण विविध खाद्यतेलांच्या वापर फोडणी, तळणी, लोणची आणि अन्य पदार्थांसाठी करत असतो. योग्य खाद्यतेलांचे सेवन केल्याने हृदयाच्या आरोग्यासाठी चरबी मोनो अन्साचुरेरेड आणि पॉली अन्साचुरेटेड फॅट्स मिळतात. ज्यामुळे खराब कॉलेस्ट्रॉल आणि जळजळ कमी होते. तसेच पेशींच्या कायासाठी, रोग प्रतिकारक शक्तीसाठी आणी मेंदूच्या आरोग्यासाठी व्हिटॅमिन इ, अँटी ऑक्सिडेंट्स आणि ओमेगा सारखे आवश्यक पोषक घटक मिळतात.तेल ऊर्जास्रोत म्हणून काम करतात आणि पचन सुधारण्यासाठी देखील उपयुक्त ठरतात.

**खाद्य तेलांचा पुनर्वापर आरोग्यासाठी कसा घातक आहे?**

○ आपण आपल्या घरात खाद्यतेलाचा योग्य वापर केला तर ते आरोग्यासाठी पोषक ठरेल.एकदा तेल उकळले की पुढील चार ते पाच तासात त्याचा पुनर्वापर योग्य ठरेल.जेणेकरून त्यातील टी एफ ए हा घटक प्रमाणात राहील.मात्र त्यानंतर या तेलाचा वापर हा घातक ठरतो. शरीरातील कॉलेस्ट्रॉल वाढते.

आपण साध्या किंवा रिफाइंड तेलांचा वापर करतो.या दोहोमध्ये फरक म्हणजे त्यांच्या उत्पादनाच्या प्रक्रिया या वेगवेगळ्या असतात. साधे खाद्यतेल तयार करताना कमीत कमी प्रक्रिया केली जाते. जेणेकरून नैसर्गिक चव , रंग, पोषक तत्वे टिकून राहतात. ते तापवल्यास धुराचे प्रमाण कमी राहते. तर रिफाइंड तेल ही जास्त टिकतात.

**न वापरता येण्याजोग्या तेलांचा पुनर्वापर वेगळे उत्पादन निर्मितीसाठी कसा शक्य आहे?**

○ असे न वापरता येण्याजोगे खाद्यतेल रोजच्या रोज हॉटेल्स, रेस्टॉरंट, वडापाव आणि अन्य खाद्यपदार्थ विक्रेते व उत्पादक यांच्याकडून गोळा करण्याची यंत्रणा उभारणे शक्य आहे. काही वर्षांपूर्वी असे तेल १५ रुपये दराने गोळा केले जात असे. हे तेल बायो फ्युएल म्हणून पेट्रोल आणि डिझेल सारख्या इंधनामध्ये मिसळणे शक्य आहे. सध्या इथेनॉल मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने आता हा प्रकल्प बंद पडला.

मात्र आता अशा न वापरता येणाऱ्या तेलापासून साबण, अगरबत्ती, वगण असे पदार्थ बनवता येऊ शकतात. असे खराब तेल नाल्यामध्ये फेकून देऊन पर्यावरणाची हानी करण्यापेक्षा सॉल्व्हेंट्स एक्स्ट्रेकर्स असाशीएशन सारख्या संस्थांच्या मदतीने अशा तेलापासून उपयुक्त उत्पादन बनविण्याचा प्रकल्प राबवता येऊ शकतो. ज्यामुळे अनेक रोजगार निर्माण होतील, मानवी आरोग्य बिघडण्याचा धोका संपेल आणि नवीन उत्पादनाचा उपयोग देखील होईल.

■ ■ ■

# उपराजधानीच्या बदलासाठी काँग्रेसचा अजेंडा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
नागपूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने २० सूत्रांचा सर्वसमावेशक कार्यक्रम जाहीर केला असून, नागपूरकरांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित १७ हून अधिक महत्त्वाच्या योजना यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

गेल्या १९ वर्षांत भाजपच्या नेतृत्वाखालील नागपूर महापालिकेच्या कारभारामुळे मूलभूत नागरी सुविधांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असल्याचा ठपका काँग्रेसने ठेवला आहे. वाढते कर, अपुरा पाणीपुरवठा, खड्डेमय रस्ते, वाहतूक कोंडी, पूरस्थिती आणि आरोग्यविषयक समस्या यामुळे नागपूरकर त्रस्त झाले असल्याचे नमूद करत, या सर्व प्रश्नांवर ठोस उपाय सुचवणारा आराखडा पक्षाने सादर केला आहे.

जाहीरनाम्यातील प्रमुख घोषणांमध्ये ५०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांना संपूर्ण मालमत्ता करमाफी, २४ बाय ७ अखंड पाणीपुरवठा आणि महिन्याला ३० हजार लिटरपर्यंत मोफत पाणी, तसेच आपली बस सेवेमध्ये महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, स्वातंत्र्यसैनिक व माजी सैनिकांसाठी मोफत प्रवास यांचा समावेश आहे. दोन वेळा कचरा संकलन, शहरातील सर्व रस्ते खड्डेमुक्त करण्यासह स्मार्ट ट्रॅफिक सिग्नलिंग, हायटेक स्ट्रीटलाईट्स, नवीन उड्डाणपूल, रेल्वे ओव्हरब्रिज व अंडरब्रिज उभारणीची योजना मांडण्यात आली आहे. भांडेवाडी डम्पिंग यार्डचे कायमस्वरूपी स्थलांतर, सांडपाणी व्यवस्थेचे पूर्ण निराकरण आणि डासमुक्त शहराची उभारणी यावरही भर देण्यात आला आहे.

> काँग्रेसने महापालिका निवडणुकीत मिशन १०० नगरसेवक असा नवा निर्धार केला असून, मनपा अंतर्गत प्रत्येक प्रभागातून अधिकाधिक नगरसेवक निवडून आणण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येत आहे.




आंध्र प्रदेशात पर्यटक आणि संशोधकांची संख्या मोठी आहे. राज्यात अनेक ठिकाणे आणि स्मारके आहेत तेव्हा तुम्ही भेट दिलीच पाहिजे. राज्यात तुम्हाला हवे असलेले जवळजवळ सर्व काही एकाच ठिकाणी आहे. आंध्र प्रदेशची पर्यटन स्थळे पाहण्यासाठी तुम्हाला किमान ७ ते ८ दिवस लागतील, कारण या राज्यात भरपूर ऑफर आहे. तुम्ही येथे एकट्या सहलीवर, कुटुंबीयांसह आणि मित्रांसह याचा आनंद घेऊ शकता!

आंध्र प्रदेश हे सर्वांसाठी, विशेषतः यात्रेकरूंसाठी नंदनवन आहे भगवान व्यंकटेश्वराच्या मंदिराबद्दल कोणी ऐकले नाही? हे हिंदूंसाठी सर्वात प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे आणि आंध्र प्रदेशातील सर्वोत्तम पर्यटन स्थळ आहे. हे तिरुमाला येथे आहे, तिरुपतीच्या सात टेकड्यांपैकी एक. स्थापत्य आणि पायवाट या दोन्ही बाबतीत हे मंदिर भव्य आहे. मंदिराला दररोज 50,000 यात्रेकरू भेट देतात आणि दररोज लाखो देणगी प्राप्त करतात. हिंदू संस्कृतीची भव्यता जाणून घेण्यासाठी या मंदिराला भेट द्यायलाच हवी.

विजयवाडा हे शहर राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहर आहे. राज्याची माध्यमे आणि राजकीय राजधानी म्हणूनही ओळखले जाणारे हे शहर काही अतिशय आश्चर्यकारक अनुभव देते. यात चित्तथरारक वास्तुकलेसह अनेक गुहा आणि खडक कापलेली मंदिरे आहेत. येथे व्हिक्टोरिया संग्रहालय आणि भवानी बेट देखील आहे, ज्याला पर्यटक भेट देऊ शकतात. प्रत्येक पार्टीत जाणाऱ्यांसाठी आनंद घेण्यासाठी यात आश्चर्यकारक नाइटलाइफ देखील आहे!

■ ■ ■

# राजधानीत ग्रंथांचा महाकुंभमेळा



ग्रंथांचा महाकुंभमेळा, अशी ख्याती असलेला ५३व्या 'नवी दिल्ली जागतिक पुस्तक मेळा-२०२६' शनिवार, १० जानेवारीपासून १८ जानेवारीपर्यंत (रविवार) प्रगती मैदान अर्थात भारत मंडपम येथे भरणार आहे.

'शौर्य आणि बुद्धिमत्ता ७५' ही मुख्य संकल्पना असलेला यंदाचा हा ग्रंथमेळा भारतीय सैन्याच्या असीम शौर्यगाथेला समर्पित असेल.

यानिमित्ताने 'शूरा मी वंदिले', या प्रसिद्ध मराठी नाट्यपदाची अनुभूती ग्रंथरसिकांना येईल. यंदा कतार हा विशिष्ट अतिथी देश, तर स्पेन फोकस राष्ट्र म्हणून दिल्ली ग्रंथमेळ्यात सहभागी होतील. भारत मंडपममध्ये होणाऱ्या या पुस्तक मेळ्याचे उद्घाटन शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते होईल. यंदाही गेल्या वर्षीप्रमाणेच प्रादेशिक भाषांमधील पुस्तकांची प्रकाशने, चर्चासत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम असे भरगच्च कार्यक्रम होतील. रसिक सकाळी ११ ते रात्री ८ पर्यंत पुस्तके आणि साहित्यिक कार्यक्रमांचा आनंदघेऊ शकतील.

देश-विदेशातील प्रकाशक आणि लेखक, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मुलांसाठी विशेष उपक्रम आदी यंदाची वैशिष्ट्ये असतील. हजारो चौरस मीटरवर पसरलेल्या या मेळ्यात हिंदी, इंग्रजी आणि प्रादेशिक भाषांमधील पुस्तकांची शेकडो दालने असणार आहेत. या १० दिवसांत ६०० हून जास्त साहित्यिक कार्यक्रम होतील.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# वर्षातील १५० दिवस नागपुरची हवा खराब

## केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालातून सत्य उघड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :
वर्षातील सरासरी १५० दिवस नागपुरात हवा प्रदूषित असते, अशी माहिती समोर आली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निरीक्षणांवर आधारित एका संशोधन अहवालातून ही बाब उघड झाली आहे. नागपूरकरांना वाहतूक कोंडीसोबतच खराब हवेमुळे होणाऱ्या आरोग्याच्या समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे.

अहवालानुसार, शहरातील विविध भागांमध्ये प्रदूषित दिवसांची संख्या लक्षणीय आहे. महाल परिसरात सर्वाधिक १८० दिवस हवा प्रदूषित आढळली, तर जीपीओ चौकात १७४ दिवस, रामनगरमध्ये १५४ दिवस आणि अंबाझरीमध्ये १३७ दिवस हवा प्रदूषित होती.



मागील वर्षातील केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, अंबाझरी भागात ३६५ दिवसांपैकी २२८ दिवस हवा चांगली किंवा समाधानकारक होती, तर १३७ दिवस प्रदूषित आढळली. महालमध्ये १८० दिवस प्रदूषित आणि १८५ दिवस चांगली हवा होती. रामनगरमध्ये १५४ दिवस प्रदूषित तर २११ दिवस चांगली हवा नोंदवली गेली, तर जीपीओ येथे १७४ दिवस प्रदूषित आणि १९१ दिवस चांगली हवा होती.

नागपुरातील वाढत्या प्रदूषणामागे अनेक कारणे आहेत. प्रामुख्याने वाहतूक, वाहनांचा धूर, औष्णिक ऊर्जा प्रकल्प आणि उद्योगांमधून होणारे वायू प्रदूषण यासाठी जबाबदार आहे. याशिवाय, आधुनिक जीवनशैलीमुळे घरात आणि घराबाहेरही वायू प्रदूषणात वाढ झाली आहे. कचरा जाळणे, लाकूड आणि कोळसा वापरणे यामुळेही हवेची गुणवत्ता खालावत आहे. वाढत्या वायू प्रदूषणामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. रुग्णालयांमध्ये दमा, श्वसन विकार, टीबी, कर्करोग, सर्दी, खोकला, डोळ्यांचे आजार, त्वचेचे विकार आणि हृदयरोगांच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याचे प्रा. सुरेश चोपणे यांनी सांगितले.